

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

ऑक्टोबर २०२३| आवृत्ती-०४ अ

# स्वच्छता ही सेवा



विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद
शताब्दी महोत्सव विशेषांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

ऑक्टोबर २०२३| आवृत्ती-०४ अ

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# स्वच्छतेमुळे विकासाला गती मिळेल - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

## गांधी सागर तलाव परिसरात स्वच्छता मोहिमेत श्रमदान






सर्वांना स्वच्छतेचे महत्व समजावे, यामुळे या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. सोबतच स्वच्छतेमुळे विकासाला गती मिळेल, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर, महापालिका नागपूर व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी सागर तलाव परिसरात रविवार, दिनांक १ ऑक्टोंबर २०१३ रोजी सकाळी १० वाजता स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता मोहीम श्रमदानास सुरुवात करताना कुलगुरू डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

स्वच्छता मोहीम श्रमदान कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर येथील पब्लिसिटी फिल्ड ऑफिसर सौरभ खेकडे, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश धामेच्या, विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, लॉयन्स क्लब नागपूरचे नितीन वर्मा यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माननीय कुलगुरू डॉ. चौधरी यांनी स्वतः स्वच्छता करणार नाही, तोपर्यंत स्वच्छतेचे महत्व समजणार नाही, असे सांगितले. अस्वच्छतेमुळे आजार होतात. त्यामुळे कुठेही कचरा फेकू नये. कचरा एका ठिकाणी गोळा करावा. त्यानंतर विल्हेवाट लावता यावी म्हणून तो कचरा संबंधित यंत्रणेच्या स्वाधीन करावा, असे कुलगुरू म्हणाले. सोबतच या स्वच्छता अभियानामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याचप्रमाणे सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी स्वच्छता ही आत्मशुद्धी तसेच आत्म शांतीसाठी महत्त्वाची असल्याचे सांगितले. महात्मा गांधी यांनी स्वच्छतेचा संदेश दिला असून स्वच्छता ही सेवा आहे. विद्यापीठ विद्यापीठाची संलग्न प्रत्येक महाविद्यालयाने या स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. चांगल्या आरोग्याकरिता स्वच्छता महत्त्वपूर्ण असल्याचा संदेश देत सर्वांनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. लायन्स क्लबचे नितीन वर्मा यांनी मार्गदर्शन करताना शहराच्या स्वच्छते करिता अभियान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. स्वच्छता ही सेवा असल्याने या श्रमदानामध्ये लायन्स क्लब देखील सहभागी झाल्याचे ते म्हणाले. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह अन्य अतिथींनी गांधी सागर उद्यानातील साफसफाई केली. यावेळी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश धामेचा यांनी श्रमदानात सहभागी विद्यार्थ्यांना गांधी सागर तलाव परिसर, फूटपाथ, त्याचप्रमाणे गणेश विसर्जन स्थळ या परिसरातील कचरा निर्मूलन कसे करावे याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाकरिता महापालिकेच्या वतीने हॅन्डग्लब, झाडू व कचरा संकलन साहित्य पुरविण्यात आले होते.






**रासेयोच्या वतीने विविध ठिकाणी अभियान**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठ परिक्षेत्रात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गांधी सागर तलाव परिसर नागपूर, फ्रीडम पार्क, झिरो माइल मेट्रो स्टेशन, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, मानव विज्ञान विभाग परिसर, महाराज बाग परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, दीक्षाभूमी परिसर, वर्धा येथील सेवाग्राम बापू कुटी, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात जिल्हास्तरावर स्थानिक ऐतिहासिक व महत्त्वाच्या स्थळांवर स्वच्छता अभियान राबविण्यात आल्याची माहिती रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी दिली.

## विदर्भाच्या कृषी विकासाचा आराखडा तयार करा

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

## डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारणार

### डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व्याख्यानमाला






विदर्भामध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. सोबतच डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आगामी ५० वर्षाकरिता विदर्भाच्या कृषी विकासाचा आराखडा तयार करा, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने विविध ठिकाणी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन व कार्यावर १२५ व्याख्यानांचे आयोजन केले जात आहे. या व्याख्यानमालेतील एक पुष्प श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील अंबाझरी मार्गावरील विद्यापीठ परिसराजवळील गुरुनानक भवन येथे शनिवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी पार पडले. यावेळी केंद्रीय मंत्री श्री. गडकरी मार्गदर्शन करीत होते. शेतकऱ्याबरोबर कृषी क्षेत्राचा मोठा फायदा व्हावा म्हणून कृषी महाविद्यालयाच्या जागेवर सरकारकडून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटरचे भूमिपूजन येत्या २७ डिसेंबर रोजी करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रिय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी केली.

व्याख्यानाला प्रमुख वक्ते म्हणून कुलगुरू संस्कृत विद्यापीठ रामटेकचे संस्थापक कुलगुरू डॉ. पंकज चांदे, प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी, अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, मंचावर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री अरुण चौधरी, राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या उपाध्यक्ष डॉ. कल्पना पांडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड. भैय्यासाहेब पुसदेकर, श्री केशवराव मेतकर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य श्री हेमंत काळमेघ, प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे, प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख उपस्थित होते.

यावेळी ना. गडकरी म्हणाले, शिक्षण क्षेत्रात श्री शिवाजी संस्था सुरू करून यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख या नावाने २१ व्या शतकातील कृषीचे व्हिजन आवश्यक आहे. भाऊसाहेबांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने कृषी क्षेत्राच्या विकासाचा एक प्रयोग व्हावा असे गडकरी म्हणाले. संकरित गाईंपासून दुधाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन शक्य आहे. यातून विदर्भात ३० लाख लिटर उत्पादनाची क्षमता निर्माण करावयाची आहे. विदर्भामध्ये मदर डेअरी ४५० कोटींचा प्रकल्प सुरू करीत आहे. शिवाय अमरावती येथे गाईंसाठी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल श्री शिवाजी शिक्षण संस्थेने सुरू करावे, असे गडकरी म्हणाले. संस्थेने पुढाकार घेऊन विदर्भातील सर्वच जिल्ह्यात हा प्रयोग यशस्वी करण्याचे आवाहन श्री गडकरी यांनी केले. विदर्भाचा विकास करण्याची जबाबदारी येथील नेते व जनतेची आहे. कृषी विकासाशी संबंधित भाऊसाहेबांचे स्वप्न या माध्यमातून आपण पूर्ण करू शकतो, असे गडकरी म्हणाले. कल्पना खूप आहे, प्रामाणिक काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. माजी न्यायमूर्ती अरुण चौधरी यांनी मनोगत व्यक्त करताना भाऊसाहेबांनी राजकारणाबरोबर समाजकारण केले. समाजकारण करताना त्यांनी वकालत केली. गरीब श्रीमंत असा भेदभाव केला नाही. बिना पैशांनी त्यांनी अनेक खटले चालविले, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यकारणी सदस्य श्री हेमंत काळमेघ यांनी भाऊसाहेबांचे १२५ जयंती वर्ष आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे शताब्दी वर्ष एकाच वर्षात येण्याचा दुग्धशर्करा योग असल्याचे सांगितले. विदर्भाची माती सांस्कृतिक आणि आध्यात्मिक गुणाने सुपीक आहे. वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराने प्रेरित होऊन भाऊसाहेबांनी शिक्षणाची दारे गरिबांसाठी खुले केले. ज्ञान, कर्म आणि भक्ती याचा संगम भाऊसाहेब होते असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठ शंभर व्याख्यानाचे आयोजन करीत आहे. विद्यापीठाचे हे तिसरे व्याख्यान असल्याचे त्यांनी सांगितले. शताब्दी महोत्सवी वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ ग्रामगीतेला अपेक्षित असे कार्य करीत असल्याचे सांगितले. नागपूर येत्या काळात औद्योगिक हब होणार असल्याने कौशल्य प्राप्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे कार्य विद्यापीठ करीत असल्याचे कुलगुरू म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी केले तर आभार कुलसचिव राजू हिवसे यांनी मानले.

## भाऊसाहेबांमुळे शैक्षणिक क्रांती

**- हर्षवर्धन देशमुख**



भाऊसाहेब हे महान व्यक्तिमत्व होते. त्यांचा विचार दुरदृष्टिचा होता. विविध विचारातील अनेक विचारवंतांना आपल्या संस्थेत आणून त्यांचा सन्मान केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तसेच समाजाच्या विकासासाठी त्यांनी कार्य केले. भारताचा आत्मा खेड्यात आहे. हा महात्मा गांधींचा विचार भाऊसाहेबांनी प्रत्यक्ष उतरविला. सावित्रीच्या लेकींना समर्थ त्यांनी केले. त्यांच्यामुळेच विदर्भात शैक्षणिक क्रांती झाली, असे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख म्हणाले.





## सारस्वतभूमीवर भाऊसाहेबांचा जन्म : डॉ. पंकज चांदे

विदर्भ ही विद्वानांची भूमी आहे. या सारस्वत भूमीवर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेबांचा जन्म झाला. त्यांच्या जडणघडणीत आईचा मोठा प्रभाव होता. ती शिस्तीची होती. या शिस्तीत त्यांचे जडणघडण झाले. त्यामुळे सुरवातीपासून भाऊसाहेब हे सामाजिक मनोवृत्तीचे राहिले. त्यांची सर्वाबरोबर आपुलकी होती. अमरावती, पुणे येथे शिक्षण घेतले. त्यांनतर इंग्लडमध्ये शिक्षणासाठी गेले. अत्यंत खडतर परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांना डायरी लिहण्याची सवय होती. मात्र, त्यात आपले दोष लिहित होते. ते दोष कमी कसे करायचे यासाठी नेहमी ते लिहित असत. आपल्या जिद्दीने गोष्ट पूर्ण करीत असत. लहानपणापासून त्यांचा मध्ये प्रामाणिकपणा होता. मद्रास सरकारने देऊ केलेली शिष्यवृत्ती त्यांनी नाकारली. दोन वर्षांचा एमए ऑनर्स अभ्यासक्रम त्यांनी एका वर्षामध्ये पूर्ण केला. भाऊसाहेब हे संस्कृत विषयाचे देखील गाढे अभ्यासक होते. त्यांनी दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविले होते. त्यामध्ये अनेक देशांच्या राष्ट्रपतींनी हजेरी लावली होती. २ कोटी लोकांनी कृषी प्रदर्शन पाहिले होते. भाऊसाहेबांचे कार्य दीर्घकाळ राहणारे आहे. त्यांच्यामध्ये नैसर्गिक नम्रता होती असे विशाल व्यक्तिमत्त्वाचे धनी भाऊसाहेब होते, असे डॉ. चांदे म्हणाले.

## सर्व सामान्यांना हाताळता येतील असे तंत्रज्ञान हवे

### माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील गांधी सप्ताहाचा समारोप








तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने प्रगती होत असून त्याचे नकारात्मक परिणाम देखील दिसून येत आहे. देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी सर्व सामान्यांना हाताळता येतील असे तंत्रज्ञान हवे असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने आयोजित महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सोमवार, दिनांक २ ऑक्टोंबर २०२३ रोजी कुलगुरू डॉ. चौधरी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करीत होते.




गांधी विचारधारा विभागात पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर उपस्थित होते. पुढे बोलताना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी महात्मा गांधी यांचे देश विकासाचे मॉडेल कसे होते, याबाबत माहिती दिली. इंग्रजांचे कारखाने बंद पडावेत म्हणून घरीच सूतकताई करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. एवढेच नव्हे तर सूतकताईला गती मिळावी म्हणून नवीन तंत्रज्ञान वापरत मशीनद्वारे देखील सूतकताई करण्यास त्यांनी प्राधान्य दिले होते. नवीन तंत्रज्ञानाचा वापर होत असताना प्रत्येक हाताला रोजगार देखील मिळावा असे महात्मा गांधी यांचे विचार होते असे कुलगुरू म्हणाले. प्रत्येकाचे दरडोई उत्पन्न वाढले तरच देशाची प्रगती होईल. त्याकरिता आपणाकडे उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उद्योग उभारणीस प्राधान्य दिले पाहिजे. महात्मा गांधी यांच्या कार्य विचार व प्रेरणेतून स्थापन वर्धा येथील एमगिरी या संस्थेत नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उत्पादन वाढीवर संशोधन पूर्वीपासूनच होत असल्याचे कुलगुरू यांनी सांगितले. सत्य, अहिंसा, समानता याचे प्रतीक महात्मा गांधी असले तरी ते सर्व मान्य व्यक्ती होते. महात्मा गांधी हे देशाच नव्हे तर जगमान्य होते. जगात आज युद्ध, अराजकता, दंगल सुरू असून पुन्हा एकदा महात्मा गांधी यांच्या विचारांची गरज असल्याचे कुलगुरू म्हणाले. तंत्रज्ञानाची प्रगती होत असल्याने पारंपारिक शिक्षण पद्धती लोप पावण्याच्या स्थितीत आहे. भविष्यातील आधुनिक तंत्रज्ञानाचे धोके ओळखून सर्वांनाच नवीन क्षेत्राचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे बदलते तंत्रज्ञान सर्वांनी आत्मसात करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात ठाकूरवाडा येथील ९९ वर्षिय ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी डॉ. पुंडलिकराव गेडाम यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या वतीने त्यांचे पुत्र सुनील गेडाम यांनी हा सत्कार स्वीकारला. यावेळी डॉ. ज्योतीमणी यांचा देखील शैक्षणिक कार्यातील सहभागा विषयी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी गांधी जयंती सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमांची माहिती दिली. व्याख्यान चित्रकला स्पर्धा प्रश्नमंजुषा स्वयंस्फूर्त भाषण आदी कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविल्याचे त्यांनी सांगितले. या विभागामध्ये सर्वच वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमात ललित कला विभागातील विद्यार्थ्यांनी 'मिले सुर मेरा तुम्हारा' पथनाट्य सादर केले. यामध्ये हर्षद सालपे (निर्देशक), विजय जथे (लेखक/गायन/अभिनय), पियुष धुमकेकर(वेष भूषा), विवेक मिस्त्री(अभिनय), निखिल टोंगळे(अभिनय/गायन), श्वेता पत्की (अभिनय), नासिर शेख (अभिनय) दिलीप कुमार वानखेडे (अभिनय), सरला डहाके (अभिनय), दीक्षा ढोमने (अभिनय), ममता काळे (अभिनय), विशाखा पवार (अभिनय), कल्पना गणवीर (अभिनय), डॉ. राजेश पेशकर (अभिनय), ओजस टेंभुर्ने (अभिनय), भाग्यश्री चीचखेडे (अभिनय), पूर्वा वाकोडे (अभिनय) यांचा समावेश होता. यानंतर आरोही म्युझिकलच्या वतीने भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन पौर्णिमा रामेकर व आशा वर्मा यांनी केले.

## पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

गांधी जयंती सप्ताह निमित्त आयोजित स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आशुतोष पोद्दार, द्वितीय क्रमांक गणेश वाळके, तृतीय क्रमांक युवराज सिंह चौहान, चतुर्थ क्रमांक लिशा पोफरे, पाचवा क्रमांक पूर्वी शेलूकर ने प्राप्त केला. चित्रकला स्पर्धेत अ गटात प्रथम क्रमांक मंथन इंगोले, द्वितीय क्रमांक सूर्यांशू बोरेकर, तृतीय क्रमांक काव्या मेश्राम, चतुर्थ क्रमांक प्रयास मेश्राम, पाचवा क्रमांक अलेक्स पेड्रल व ऋतुजा गेडाम ने तर ब गटात प्रथम क्रमांक राधा बागेकर, द्वितीय क्रमांक आरिया लवात्रे, तृतीय क्रमांक अवंतिका घोष, चतुर्थ क्रमांक प्रसिद्धी उरकुडे, पाचवा क्रमांक दिव्या ठवकर व हिरण्य मेश्राम यांनी प्राप्त केला. प्रश्नमंजुषा स्पर्धेत अ गटात प्रथम क्रमांक शिरीष कुमार, द्वितीय क्रमांक सुरज रावत, तृतीय क्रमांक हर्षिता पांडे व मोहम्मद साहिल अली यांनी प्राप्त केला. ब गटात प्रथम क्रमांक अश्विनी राऊत, द्वितीय क्रमांक अपेक्षा महाकाळकर, तृतीय क्रमांक मोहम्मद हाजी रजा, चतुर्थ क्रमांक विशाल पांडे व महेश दुर्गम, पाचवा क्रमांक अतुल चव्हाण व ताहाउद्दीन यांनी प्राप्त केला. सर्व पुरस्कार विजेत्या स्पर्धकांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# डोपिंगमुळे खेळाडूच नव्हे तर प्रशिक्षकांची कारकीर्दही संपते

**डॉ. संजोगिता सुदन यांचे प्रतिपादन**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे आयोजन**

डोपिंगमध्ये सापडल्यानंतर त्या खेळाडूचे स्पोर्ट्स करिअर तर संपतेच, यासोबतच त्याच्या प्रशिक्षकांची क्रीडा कारकीर्द देखील संपुष्टात येते. शिवाय समाजात असलेली पालकांची प्रतिष्ठा देखील नाहीशी होते, असे प्रतिपादन नॅशनल अँटीडोपिंग एजन्सीच्या मुख्य अधिकारी तसेच भारतीय बॉक्सिंग कौन्सिल मेडिकल कमिशनच्या अध्यक्षा डॉ. संजोगिता सुदन यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने डोपिंगमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती विषयावर अतिथीय व्याख्यानाचे आयोजन रवीनगरातील विद्यापीठाच्या क्रीडा विभाग कार्यालयात करण्यात आले. त्यावेळी डॉ. सुदन बोलत होत्या. यावेळी उपस्थित खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा संघटनांना डोपिंग विषयी माहिती देण्यात आली.

याप्रसंगी बोलतांना डॉ. सुदन म्हणाल्या, डोपिंगमुळे खेळाडूंच्या शरीरावर देखील मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होतो. किडनी फेलीवर, हार्ट अटॅक सारख्या दुर्घटना त्यांच्यासोबत होऊ शकतात. पुरुषांना महिलांसारखे शरीराचे अवयव वाढीला लागतात. तर महिलांना पुरुषांसारखी दाढी येणं आणि अनेक प्रकारच्या गोष्टी त्यांच्यामध्ये बदल दिसून येतात. या सर्वांपासून दूर राहण्यासाठी सर्व खेळाडूंनी भरडधान्य आणि भारतीय आहार पद्धतीचा वापर करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. नॅशनल अँटी डोपिंग एजन्सी यापुढे रीजनल अँटिडोपिंग एजन्सीसाठी प्रयत्नरत आहेत. त्या दृष्टिकोनातून नागपूर विद्यापीठाने प्रयत्न करावा यासाठी पुढाकार घ्यावा अशी इच्छा त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. विद्यापीठाच्या परिसरामध्ये अद्यायावत सुविधा असणारे स्पोर्ट्स सायन्स सेंटर आणि विद्यार्थ्यांना नियमित डोपिंग विषयी मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात यावी असा आग्रह सुद्धा त्यांनी यावेळी विद्यापीठ प्रशासनाला केला.

याप्रसंगी विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्याहस्ते डॉ. संजोगिता यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र टेबल टेनिस असोसिएशनचे सचिव ॲड. आशुतोष पोतनीस, एमबीएचे अध्यक्ष डॉ. धनंजय वेळुकर, नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. नितीन जंगीटवार, खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सचे समन्वयक डॉ. मनोज आंबटकर, गुलाबनबी आझाद कॉलेजचे प्राचार्या डॉ. विवेकानंद सिंग, एनडीएएचे सहसचिव अर्चना कोट्टेवार, ॲथलेटिक्स प्रशिक्षक जितेंद्र घोरदडेकर, गौरव मिरासे, ॲथलेटिक्स खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षक सायली वाघमारे, बेसबॉलपटू गणेश वाणी, फ्लोअरबॉल विद्यापीठ संघाची कर्णधार ऋतिका किन्हेकर, मार्शल आर्ट खेळाडू नितीन धाबेकर, भुषण धारपुरे, अतुल धाबोरकर, शिवानी नेगी, पायल रिठे, कामाक्षी, अंकित दोडके आदी उपस्थित होते.

# प्राणीशास्त्र विभागात फुलपाखरू सप्ताह उत्साहात

## सप्ताह निमित्त विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्राणीशास्त्र विभागात २५ ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत फुलपाखरू सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. "चेरीश एव्हरी फ्लटर- फुलपाखरू संवर्धन तुमच्यापासून" या टॅग लाइनला घेऊन "फुलपाखरू सप्ताह २०२३" साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे निमंत्रक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (सौ.) व्ही. टी. धुर्वे, संघटक सचिव डॉ. एस.सी. मसराम आणि समन्वयक म्हणून श्री. पवन चनकापुरे आणि कु. अंकिता शर्मा यांनी कार्य सांभाळले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन विभाग प्रमुख डॉ. (सौ.) व्ही. टी. धुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी, संशोधन विद्यार्थी, एम.एस्सी. सेमिस्टर १ व सेमिस्टर ३ चे विद्यार्थी उपस्थित होते. या फुलपाखरू सप्ताह दरम्यान विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उद्घाटनानंतर बटरफ्लाय वॉक २५ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला. २६ सप्टेंबर २०२३ रोजी फोटोग्राफी स्पर्धा आणि २७ सप्टेंबर २०२३ रोजी विभागामध्ये अतिथी व्याख्यान आणि संग्रहालय भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी काढलेले फुलपाखरांचे सुंदर छायाचित्र सादर केले. फोटोग्राफीचे पहिले पारितोषिक तिसर्या सत्रातील श्री. महेंद्र कटरे यांना तर द्वितीय पारितोषिक सेमिस्टर १ मधील श्री. हर्ष तिवारी यांना देण्यात आले. याशिवाय सेमिस्टर ३मधील कु. ऐश्वर्या आतिलकर आणि अचल बोबडे आणि सेमिस्टर १ मधील प्रेरणा लांजेवार यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. २७ सप्टेंबर २०२३ रोजी तिसर्या दिवशी पाहुण्यांचे व्याख्यान नियोजित करण्यात आले. विसापूर, चंद्रपूर येथील श्रद्धा अटलबिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डनमधील जीवशास्त्रज्ञ कु. योगिता छापेकर यांनी "फुलपाखरू विविधता" या विषयावर मार्गदर्शन केले. अतिथी व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विभागीय संग्रहालयाला भेट दिली. जिथे श्री. पवन चणकापुरे आणि कीटकशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या गटाने संग्रहालयातील विविध फुलपाखरू कुटुंबांचे वर्णन केले. सेमिस्टर १ आणि ३ च्या विद्यार्थ्यांनी २९ सप्टेंबर २०२३ रोजी फुलपाखरांवरील सेमिनारमध्ये भाग घेतला. फुलपाखरांच्या अनेक प्रतिमा आणि व्हिडिओ त्यांच्या सादरीकरणांमध्ये त्यांची विविधता, निवासस्थान आणि वर्तन आदी दर्शविले. परिसंवादानंतर विभागाच्या व्याख्यानमालेत सप्ताहाचा समारोप झाला. विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (सौ.) व्ही.टी. धुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली २५ ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीतील फुलपाखरू सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमांचा सारांश आयोजन सचिव डॉ. एस. सी. मसराम यांनी सांगितला. शेवटी आभार पवन चनकापुरे यांनी मानले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातील सभागृहात २९ सप्टेंबर २०२३ रोजी फुलपाखरू सेमिनार आणि फुलपाखरू सप्ताहाचा समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



# औषधीनिर्माणशास्त्र विभागात 'स्वच्छताही सेवा' उपक्रम

## स्वच्छ व हिरवेगार परिसरासाठी शिक्षक- विद्यार्थ्यांनी केली साफसफाई

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागात रविवार, दिनांक १ आक्टोंबर २०२३ रोजी 'स्वच्छताही सेवा' उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात प्राध्यापक, कर्मचारी आणि उत्साही विद्यार्थी यांनी एकत्र येत स्वच्छता आणि पर्यावरण विषयक जागरुकतेची बांधिलकी दर्शवली. या उपक्रम अंतर्गत औषधी निर्माणशास्त्र विभाग परिसर स्वच्छ करण्यात आला.






शैक्षणिक उत्कृष्टतेच्या समर्पणासाठी ओळखल्या जाणार्या औषधी निर्माणशास्त्र विभागाने एका वेगळ्या स्वरूपाच्या शैक्षणिक पर्यावरणीय उपक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासाठी काही वेळ पाठ्यपुस्तकांमधून ब्रेक घेतला होता. स्वच्छताही सेवेच्या बॅनरखाली स्वच्छता मोहिमेला प्रारंभ करण्यासाठी सहभागी सकाळी लवकर स्वयंसेवक एकत्र आले. कचरा काढणे, झाडणे आणि कॅम्पसचे सुशोभीकरण करण्याचे कार्य स्वच्छता अभियानादरम्यान करण्यात आले. स्वयंसेवकांनी प्रत्येक कोपरा व खडा न खडा शोधून काढला. शारिरीक स्वच्छतेसोबतच, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि हरित पर्यावरणाचे महत्त्व सहभागी स्वयंसेवकांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमात बोलताना औषध निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर यांनी तरुण पिढीमध्ये स्वच्छतेची जबाबदारीची भावना रुजविण्याचे महत्त्व पटवून दिले. रासेयो अधिकारी डॉ. प्रकाश इटनकर यांनी 'स्वच्छताही सेवा' हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नव्हे तर वर्षभर आपल्या सभोवतालची स्वच्छता राखण्याची ती वचनबद्धता असल्याचे सांगितले. विभागातील विद्यार्थी या मोहिमेत सक्रियपणे सहभागी होताना पाहून आनंद होतो आहे, कारण हे विद्यार्थी स्वच्छ आणि हिरवेगार भविष्याचे मशाल असल्याचे सांगितले. स्वच्छता मोहिमेचे आयोजन आणि अंमलबजावणी करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या विद्यार्थ्यांनी उत्साह व्यक्त केला. संशोधक विद्यार्थी श्री. योगेश निकम याने या उपक्रमाचा भाग असणे अभिमानास्पद असल्याचे सांगितले. हे केवळ स्वच्छतेबद्दल नाही; ते आपल्या पर्यावरणाची जबाबदारी घेण्याबद्दल आहे. आम्हाला आशा आहे की कॅम्पसमध्ये अशा आणखी उपक्रमांना प्रेरणा मिळेल, असे निकम म्हणाले.

औषधी निर्माणशास्त्र विभागाने स्वच्छताही सेवेच्या पलीकडे स्वच्छता आणि पर्यावरण जागृतीसाठी आपले प्रयत्न सुरू ठेवण्याची योजना आखली आहे. शाश्वत आणि पर्यावरणपूरक कॅम्पसमध्ये योगदान देण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्याचा विभागाचा मानस आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील औषधी निर्माणशास्त्र विभागाने सक्रिय नागरिकत्व आणि पर्यावरणीय जाणीवेचे उदाहरण प्रस्थापित केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे इतर शैक्षणिक संस्था आणि समुदायांना स्वच्छ आणि हरित भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## विद्यापीठ मुलींच्या वसतिगृहात 'स्वच्छता ही सेवा' उपक्रम



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गांधीनगर येथील मुलींच्या वसतिगृहात स्वच्छता ही सेवा उपक्रम रविवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी राबविण्यात आला. यावेळी वसतिगृहाच्या वरिष्ठ अधीक्षिका डॉ. रिता वडेटवार, अधीक्षिका कु. सरोज लांजेवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. स्वच्छता ही सेवा (गारबेज फ्री इंडिया) उपक्रमांतर्गत ''आइए, एकसाथ मिलकर करें एक घंटे स्वच्छता के लिए श्रमदान'' या केंद्र शासनाच्या स्वच्छता अभियानांतर्गत विद्यापीठ मुलींच्या वसतीगृहात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी वसतिगृहाच्या वरिष्ठ अधीक्षिका डॉ. रिता वडेटवार यांनी मार्गदर्शन करताना स्वच्छतेबाबत माहिती दिली. परिसर स्वच्छ ठेवल्यास उत्तम आरोग्य लाभते असे त्यांनी सांगितले. शिवाय केंद्र सरकारच्या या अभियानाविषयी विस्तृत माहिती दिली. वसतिगृहातील विद्यार्थिनींनी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत स्वच्छता अभियान राबवत संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. या उपक्रमात वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.




## विद्यार्थ्यांनी घेतली औषधी निर्माण करण्याची माहिती

### औषधी निर्माणशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अजंठा फार्माला भेट

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी औषधी निर्माण करण्याच्या प्रक्रियेची माहिती जवळून जाणून घेतली. विभागातील विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील अजंठा फार्मा लि. या कंपनीला नुकतीच भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी औषधी निर्माण प्रक्रिया आणि गुणवत्ता मानकांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील बॅचलर ऑफ फार्मसी (बी. फार्म) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून या शैक्षणिक भेटीचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांवर शैक्षणिक आणि व्यावसायिक ठसा कायमचा उमटविणाची संधी मिळणार आहे. या नवोदित फार्मासिस्टना महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगरच्या मध्यभागी असलेल्या USFDA मान्यताप्राप्त औषधी उत्पादन सुविधा असलेल्या प्रसिद्ध अजंठा फार्मा लि.ला भेट देण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांना औषधी निर्माण प्रक्रिया आणि गुणवत्ता मानकांचा प्रत्यक्ष अनुभव व्हावा म्हणून या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. अजंठा फार्मा लि. उच्च दर्जाची औषधी तयार करण्याच्या वचन बद्धतेसाठी ओळखली जाते. विद्यार्थ्यांना या समर्पणाचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्याची संधी मिळाली.

भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांना अजंठा फार्मा प्लांटमधील अत्याधुनिक सुविधांची माहिती देण्यात आली. त्यांना विविध उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया आणि संशोधन आणि विकास क्रियाकलापांचे निरीक्षण करता आले. अजंठा फार्मा कंपनीला भेट दिल्यामुळे विद्यार्थ्यांना औषधी निर्माण क्षेत्रातील विविध बाबींची माहिती प्रत्यक्ष मिळाली. वर्ग खोलीतील शिक्षणासोबतच प्रत्यक्ष प्रात्यक्षिक बघण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. अजंठा फार्मा लि.मध्ये काम करणारे उद्योग तज्ञ आणि व्यावसायिकांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणे हे या भेटीचे एक वैशिष्ट्य होते. यावेळी विद्यार्थी अभ्यासपूर्ण चर्चांमध्ये गुंतले आणि औषधी निर्माण उद्योगातील आव्हाने आणि नवकल्पनांमध्ये मौल्यवान अंतर्दृष्टी मिळवली. अजंता फार्मा लि. ही कंपनी USFDA मान्यताप्राप्त असल्याने अशा प्रतिष्ठित मान्यता मिळवण्यासाठी आणि राखण्यासाठी औषधी कंपन्यांना पाळावे लागणार्या कठोर नियामक आवश्यकतांबद्दल विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. औषधी गुणवत्तेसाठी जागतिक मानके समजून घेण्यासाठी हा अनुभव अमूल्य होता.

विद्यार्थ्यांच्या वतीने विद्यार्थी समन्वयक श्री. चक्रधर चंद्रवंशी यांनी UDPS माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम अग्रवाल, अजंता फार्मा लि.चे अध्यक्ष श्री. सतीश अग्रवाल, विभागप्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर व शिक्षकांचे आभार व्यक्त केले. प्रभारी डॉ. प्रकाश इटनकर ज्यांनी भेटीचे संचालन केले. डॉ. प्रमोद साळवे, डॉ. सत्येंद्र प्रसाद, सौ. रुपाली प्रसाद, प्रणिता कनोजिया आणि श्री. परिमल हाडगे यांनी प्रवास आणि भेटीच्या काळात विद्यार्थ्यांना सोबत घेऊन मार्गदर्शन केले. समता फाऊंडेशन आणि अजंठा फार्मा लि.च्या पथकाने केलेले स्वागत आणि आदरातिथ्य ही विद्यार्थ्यांनी मान्य केले. त्यांना औषधी निर्माण प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण उपाय आणि आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन करण्याचे महत्त्व याविषयी सखोल माहिती दिली.

## प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी घेतली परीक्षा पूर्वतयारी बैठक

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा १६ ऑक्टोंबरपासून



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची हिवाळी-२३ परीक्षा सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू होत आहेत. हिवाळी-२३ परीक्षेचे नियोजन करण्याबाबत परीक्षा पूर्वतयारी बैठक परीक्षा भवन येथे माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडली. पुनर्मूल्यांकनाचे निकाल तातडीने लावण्याचे निर्देश देखील प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी बैठकीत दिले.

परीक्षा भवन येथे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत हिवाळी-२३ परीक्षेबाबत पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. हिवाळी परीक्षेचे वेळापत्रक, विद्यापीठ परीक्षेत्रातील परीक्षा केंद्र, परीक्षार्थी विद्यार्थी, केंद्रप्रमुख त्याचप्रमाणे परीक्षेकरिता आवश्यक साहित्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी दिली. हिवाळी परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षा केंद्र अधिकारी यांची बैठक गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे. हिवाळी परीक्षेबाबत विद्यार्थी तसेच महाविद्यालयांना अडचणी येणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश डॉ. दुधे यांनी दिले. परीक्षा सुरळीत पार पाळण्याकरिता परीक्षा केंद्रांवर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन त्यांनी केले. पुनर्मूल्यांकन निकाल तातडीने घोषित करण्याचे निर्देश प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी बैठकीमध्ये दिले. सोबतच हिवाळी-२३ परीक्षेचे मूळ निकाल घोषित झाल्यानंतर लगेच पुनर्मूल्यांकन प्रक्रियेची कारवाई तातडीने करावी असे देखील त्यांनी सांगितले. यावेळी बैठकीला उपक्रम उपकुलसचिव (परीक्षा) श्री. नवीन परशुराम मुंगळे, उपकुलसचिव श्री. मोतीराम तडस, सहाय्यक कुलसचिव संगिता आत्राम, श्री. राजेंद्र पाठक, श्री. नितीन कडबे, श्री. धनुसिंग पवार, अधीक्षक श्री. नरेंद्र आत्रामे, श्री. प्रसाद आमटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## तेजस्विनी लामकाणे, रितिक पंचबुद्धेला सुवर्ण पदक विद्यापीठाची अर्ध मॅरेथॉन वार्षिक क्रीडा स्पर्धा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन अर्ध मॅराथॉन स्पर्धेत महिला गटात तेजस्विनी लामकाणे आणि पुरुष गटात रितिक पंचबुद्धे यांनी प्रथम स्थानासह सुवर्ण पदक आपल्या नावे केले आहेत. रविवार ८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठ क्रीडा संकुल, अमरावती रोड येथून या स्पर्धेला सुरुवात झाली. तसेच याच ठिकाणी स्पर्धेचा समारोप करण्यात आला.

२१ किमी धावण्याच्या स्पर्धेत पुरुष गटात अव्वल स्थान आयडीसीपीईच्या रितिक एस. पंचबुद्धे याने प्राप्त केले. रितिकने १ तास ११.५६ सेकंदाची वेळ नोंदविली. दुसरे स्थान ए डी. भारसिंगी महाविद्यालयाच्या विकास पी. बिसने याने १ तास १२. ३९ सेकंदाची वेळ नोंदवित प्राप्त केले. तिसरा क्रमांक त्याचाच सहकारी सागर सिंधापूरे याने १ तास १३.४६ एवढी वेळ नोंदवित प्राप्त केले. चवथ्या स्थानी एस बी सिटीचा गौरव खडतकर तर पाचव्या स्थानी एडी भारसिंगीचा सनी फुसाटे राहिला.

महिला गटात पीजीटीडी ऑफ फिजिकल एज्युकेशनची तेजस्विनी लामकाणे हिने १ तास २३.४४ सेकंदाची वेळ नोंदवित सुवर्ण पदक आपल्या नावे केले. दुसरे स्थान एलपीसी मंदाडची पुजा पंचबुद्धे हिने प्राप्त केले. तिने १ तास ३१.२९ अशी वेळ नोंदविली. तिसऱ्या स्थानी एस बी सिटीच्या प्रांजली मालखेडे हिला समाधान मानावे लागले. तिने १ तास ३८. ११ सेकंदाची वेळ नोंदविली. अरविंदबाबू देशमुखच्या निधी तरारेने चवथे स्थान प्राप्त केले. निधीने १ तास ३९.५३ एवढी वेळ नोंदविली.

तत्पूर्वी स्पर्धेला हिरवी झेंडी अरुणराव कलोडे महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण आणि क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. नितीन जंगीटवार, डॉ. प्रवीण लामखेडे, नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी यांनी दाखविले. याप्रसंगी डॉ. राजू राऊत, डॉ. वर्मा, डॉ. संजय खळतकर, डॉ. श्रीराम आगलावे, डॉ. विबेकानंद सिंग, एनडीएएचे सहसचिव अर्चना कोट्टेवार, नितीन धाबेकर, हर्ष सिंग, रोशनी खोब्रागडे, प्रिया भोरे, अक्षय पाल, अंकित भडके आदी उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख म्हणून डॉ. विबेकानंद सिंग यांनी जबाबदारी सांभाळली.






## देवग्राम खऱ्या अर्थाने 'देवग्राम' बनेल - डॉ. संजय दुधे
## देवग्राम येथे अंत्योदय फॅशन डिझाईनिंग प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन



फॅशन डिझाइनिंगचे प्रशिक्षण घेतल्यानंतर बचत गटाच्या माध्यमातून उद्योग निर्मितीतून देवग्रामला खऱ्या अर्थाने 'देवग्राम' बनवू शकतो, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव वर्षाच्या निमित्ताने राबविल्या जात असलेल्या **'रिच टू अनरीच्ड'** उपक्रम अंतर्गत समता फाउंडेशन व अंत्योदय मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने नरखेड तालुक्यातील देवग्राम येथील जीवन विकास महाविद्यालयात फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करताना डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

जीवन विकास महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ संजय दुधे, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंत्योदय मिशन देवग्रामचे अध्यक्ष डॉ. भास्कर विघे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतिश चाफले, निकिता फार्माचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रवलीन खुराणा, निकिता फार्माच्या संचालक सौ. इंद्रजितकौर खुराणा, झिम लॅबोरेटरी कळमेश्वरचे सीएफओ श्री. श्याम पात्रो, झिम लॅबोरेटरीचे श्री. मोहन सौदागरे, प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे व्यासपीठावर उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षात समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा म्हणून ग्राम चलो अभियान ('रिच टू अनरीच्ड') राबवित असल्याचे सांगत प्र-कुलगुरु डॉ. दुधे हे राष्ट्रसंतांच्या विचाराप्रमाणे गाव समृद्ध तर देश समृद्ध व्हावा असे म्हणाले. समाजाच्या विकासासाठी काही लोक धडपडत असतात. स्वतःसह दुसऱ्याच्या देखील झालेला विकास हा शाश्वत असतो. येणाऱ्या काळात चांगल्या आरोग्यासाठी शहरातून गावाकडे यावे लागणार आहे. कोरोना संकट काळात कृषी व फार्मा उद्योग क्षेत्राने देशाला तारले असल्याचे डॉ. दुधे यांनी सांगितले. जगात कुटुंब संस्कृती जीवनमूल्य नसल्याने लोप पावत आहे. नीतीमत्तेशिवाय कोणत्याही देशाची संस्कृती टिकू शकत नाही. त्यामुळे जगाने देखील आता 'वसुदैव कुटुंबकम' ही भूमिका स्वीकारली असल्याचे ते म्हणाले. उत्साह, हिम्मत, विश्वास, आशा असेल तर जीवनात समृद्धी येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वप्ने पाहत ते जीवनात प्रत्यक्षात आणण्याचे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. दुधे केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतिश चाफले यांनी लोकांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचे काम समता फाउंडेशन व अंत्योदय मिशन करीत असल्याचे सांगितले. विद्यापीठाकडून राबविले जात असलेले ग्राम चलो अभियान गावांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करीत असल्याचे ते म्हणाले. निकिता फार्माचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रवलीन खुराणा यांनी मनोगत व्यक्त करताना समता फाउंडेशनने आतापर्यंत ६ लाख नागरिकांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया केली असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील मुले-मुली पुढे यावेत, जगात नाव मोठे करावे, असे ते म्हणाले. यावेळी झिम लॅबोरेटरीचे श्री. श्याम पात्रो व श्री. मोहन सौदागरे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात अंत्योदय मिशन संस्थेच्या वतीने प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांना अंत्योदय सामाजिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी सन्मानपत्राचे वाचन उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे यांनी केले. अध्यक्षीय भाषण करताना अंत्योदय मिशनचे अध्यक्ष डॉ. भास्कर विघे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा गांधी यांच्या ग्राम विकासाबाबत असलेल्या संकल्पनांची माहिती दिली. मा. गांधी यांनी चरख्यातून स्वावलंबनाची सुरुवात केली. छोट्या व्यवसायातून देशाच्या प्रगतीचा मार्ग आहे. विद्यापीठ गितात देखील 'उद्योगी तरूण वीरशिलवान दिसू दे' असा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी केले. संचालन डॉ. मंगेश आचार्य यांनी केले तर आभार प्रा. नागेश ढोबळे यांनी मानले.

### आयुष्यमान भारत कार्ड व नेत्र तपासणी

शिलाई मशिनने सुसज्ज अशी फॅशन डिझायनिंग लॅबचे उद्घाटन करण्यात आले. समता फाउंडेशनच्या मास्टर ट्रेनर स्मिता कांबळे यांच्या नेतृत्वात देवग्राम येथील जीवन विकास महाविद्यालयात आयुष्यमान भारत कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. आयुष्यमान कार्ड शिबीर आदित्य उखळकर, नेत्र तपासणी शिबिरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्रतज्ज्ञ डॉ. तृप्ती सुटे, तंत्रज्ञ नवोशिया अशरफी यांनी नेत्र तपासणी केली. यावेळी समता फाउंडेशनच्या सदस्य व महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.





# सुसंस्कारी मानवी वर्तन राष्ट्र विकासाची दिशा
## विश्वस्नेह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत ठाकरे यांचे प्रतिपादन
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत व्याख्यानमाला




बलशाली राष्ट्र निर्माण करायचे असेल तर राष्ट्रभावना निर्माण होऊन नागरिक राष्ट्राचा घटक म्हणून उदयास येणे गरजेचे आहे. याकरिता वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत सुसंस्कारी मानवी वर्तनातून राष्ट्र विकासाची दिशा दर्शवली असल्याचे प्रतिपादन विश्वस्नेह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत ठाकरे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५५ वी पुण्यतिथी कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात बुधवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडला. या अनुषंगाने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफतांना डॉ. ठाकरे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, व्याख्याते विश्वस्नेह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत ठाकरे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ राजू हिवसे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती. 'राष्ट्र विकासाचे अपरिहार्य तत्त्वज्ञान - राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. ठाकरे यांनी राष्ट्रसंतांचे देश आणि मानवी वर्तनाबाबत विचार सांगितले. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून राष्ट्र विकासाचे मूलभूत तत्व सांगितले आहे. देशाला विकासाच्या दिशेने न्यायचे असेल तर मानवाच्या वर्तनाकडे लक्ष दिले पाहिजे, असे राष्ट्रसंत म्हणतात. माणूस जन्माला येण्या अगोदर समाजाचा घटक असलेल्या आईकडे संस्काराचा खजिना आहे. याबाबत देखील ग्रामगीतेत महिलांनी कशी उन्नती करावी, याबाबत राष्ट्रसंतांनी सांगितले आहे. विद्यार्थ्यांना संबोधन करताना राष्ट्रसंतांनी देशाच्या चेहऱ्याकडे कोण लक्ष देईल असा उपदेश दिला आहे. कवी, पुढारी, साधुंना देखील राष्ट्रसंतांनी राष्ट्रभावना निर्माण करण्याबाबत उपदेश केला आहे. राष्ट्रसंत केवळ लिखाणच करीत नव्हते तर प्रत्यक्ष कृतीत देखील त्यांचा सहभाग राहत होता. महाराजांच्या शब्दांमध्ये तत्वज्ञानाचा गाभा आहे. महाराजांचा तत्त्वज्ञानाचा गाभा समाजाला सांगण्याची गरज असल्याचे डॉ. ठाकरे म्हणाले. गावातील वाचनालय, मंदिर हे लोकशिक्षणाचे केंद्र व्हावे असे महाराज सांगतात. व्यक्तिमत्व विकासावर देखील महाराजांनी ग्रामगीतेतून उपदेश दिला आहे. महाराजांचे तत्वज्ञान तरुणांना नशेच्या विळख्यातून बाहेर काढू शकते. मुलांना सुसंस्कारी करण्याकरिता सामुदायिक प्रार्थना व सामुदायिक ध्यान महत्त्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. प्रत्येक सुसंस्कारी व्यक्ती देशासाठी काम करेल तेव्हा चित्र वेगळे असेल. राष्ट्रभक्ती निर्माण होईल, नवनिर्मिती होईल, कार्याची प्रेरणा मिळेल, वस्तूपाठ तयार होईल. त्यामुळे वंदनीय राष्ट्रसंतांचे व्यापक विचार हेच व्यापक तत्वज्ञान असल्याचे डॉ. ठाकरे म्हणाले.



यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे सांगितले. याचाच भाग म्हणून राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंतांच्या विचारांवर अंमल करीत विद्यापीठांनी 'रिचिंग टू अनरीच्ड' हा उपक्रम सुरू केला आहे. सर्व शासकीय यंत्रणा, संशोधन संस्था, सामाजिक संघटना, तज्ञ यांच्या माध्यमातून विविध योजना सुरू होत आहे. भंडारा जिल्ह्यामध्ये या उपक्रमावर अंमल सुरू झाला असून गोसेखुर्द प्रकल्पातील बाधित ९० गावातील नागरिकांना रोजगाराभिमूक कौशल्य तसेच रोजगार मिळवून देण्याचा विद्यापीठ प्रयत्न करीत आहे. विद्यापीठाकडे मोठ्या प्रमाणात युवा शक्ती असून त्याचा उपयोग योग्य दिशेने केला जात असल्याचे म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना जी-२० मध्ये का मांडावी लागली याबाबत माहिती दिली. संपूर्ण जगाला शाश्वत विकासाची गरज असून ते राष्ट्रसंतांच्या विचारात दडले असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक करताना राष्ट्रसंत अध्यासन विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## राष्ट्रसंतांच्या पुतळ्याला हारार्पण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्रामगीता भवन येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्याला पुण्यतिथी निमित्त माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते हारार्पण करण्यात आले. यावेळी विश्वस्नेह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत ठाकरे, कुलसचिव डॉ राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, अधिष्ठाता डॉ संजय कवीश्वर, डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. शामराव कोरेटी, डॉ. प्रशांत कडू यांच्या सह विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुरस्काराचे वितरण

राष्ट्रसंत व्याख्यानमाला कार्यक्रमात पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. विद्यापीठ शताब्दी महोत्सव निमित्त शताब्दी गीताचे लिखाण करणारे बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालयातील डॉ. शेखराम परसराम येलेकर यांचा प्रमुख अतिथींच्या असते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 निमित्य आयोजित पोस्टर स्पर्धेतील प्रथम पुरस्कार रवींद्र विश्वनाथ भर्रे, द्वितीय पुरस्कार गोपाल सुभाष बुरडे तर तृतीय पुरस्कार राजकुमार बळीराम बोरकर यांनी प्राप्त केल्याने त्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.





## सीएटच्या रोजगार मेळाव्यात ९ विद्यार्थ्यांची निवड

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाचे आयोजन

टायर उत्पादन क्षेत्रातील नामांकित अशा सीएट (CEAT) कंपनीचा रोजगार मेळावा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सभागृहात बुधवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायं. ६ दरम्यान पार पडला. रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यात सिएट कंपनीमध्ये ९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

सिएट कंपनीकडून आयोजित रोजगार मेळाव्यासाठी एकूण १४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. कंपनीकडून असोसिएट ट्रेनिंग या पदासाठी घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात ४९ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. पदवी तसेच पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त व्हावा म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी रोजगार व प्रशिक्षण विभाग सुरू केला आहे. या विभागाच्या माध्यमातून विविध कंपन्यांचे रोजगार मेळावे विद्यापीठ परिक्षेत्रात आयोजित केल्या जात आहे. सिएट कंपनीकडून आयोजित रोजगार मेळाव्यात सुरुवातीला मोबाईल डिव्हाईसवर लेखी परीक्षा घेण्यात आली. सायको-डायग्नोस्टिक चाचणी नंतर प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आली. सिएटचे वरिष्ठ एचआर मॅनेजर श्री. अतुल जिचकार, वरिष्ठ मॅनेजर (प्रॉडक्शन) श्री. पियुष चिखलकर, असिस्टंट मॅनेजर एचआर श्री. आनंद कद्रे व मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह श्री. अक्षय पांडे यांच्याकडून ही प्रक्रिया राबविण्यात आली. असोसिएट ट्रेनिंग या पदासाठी २०२२ आणि २३ मधील बीएससी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) विषय घेऊन उत्तीर्ण विद्यार्थी पात्र होते. पुरुषांसाठी कमीत कमी १५२.५ सेमी उंची तर महिलांकरिता १५२.५ सेमी उंची आवश्यक होती. त्याचप्रमाणे पुरुषांचे कमीत कमी वजन ५० किलो ग्रॅम तर महिलांकरिता ४५ किलो ग्रॅम वजन असणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे १८ वर्ष पूर्ण तर २४ वर्षाखालील वय आवश्यक होते. सिएट कंपनीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी अभिनंदन केले आहे.

# आंतरविद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात निवड चाचणी









आंतर विद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धेकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची चमू गठीत करण्यासाठी कलावंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. रवींद्रनाथ टागोर मार्गावरील महाराज बाग चौक स्थित दीक्षांत सभागृहात आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी बुधवार, दिनांक ४ ऑक्टोंबर ते शुक्रवार ६ ऑक्टोंबर दरम्यान पार पडली. माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड चाचणीस सुरुवात करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची घोषणा विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी केली.

आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणीमध्ये एकूण ७० महाविद्यालयातील ८५० विद्यार्थी सहभागी झाले होते. साहित्यिक, ललित कला, संगीत, नाटक व नृत्य प्रकारात प्रथम क्रमांकावर राहिलेल्या विद्यार्थ्यांची राज्य तसेच क्षेत्रीय सांस्कृतिक स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या चमूमध्ये निवड करण्यात आली आहे. संगीत गटातील शास्त्रीय संगीत व सुगम संगीतप्रकारात व्ही. एन. शासकीय कला, सामाजिक विज्ञान संस्था नागपूर येथील तेजस्विनी खोडतकर, शास्त्रीय ताल वाद्य प्रकारात धनवटे नॅशनल कॉलेज येथील कनक मसराम, शास्त्रीय ताण वाद्य प्रकारात हिस्लॉप कॉलेजची निधी भालेराव, पाश्चात्य गायनमध्ये रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील अमन दळवणकर, पाश्चात्य वादन करीता शिवाजी विज्ञान शौनक हिरडे यांची निवड करण्यात आली आहे. नृत्य गटातील शास्त्रीय नृत्य प्रकारात हिस्लॉप कॉलेजची कामाक्षी हम्पीहोली हीची निवड करण्यात आली.

ललित कला गटातील ऑन स्पॉट पेंटिंग प्रकारात गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड डिझाईन मधील राज सातपैसे, पोस्टर मेकिंग प्रकारात गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड डिझाईन मधील गौरी पहुणे, कोलाज मेकिंग प्रकारात याच महाविद्यालयातील मृणाल कांबळे, कार्टूनिंग प्रकारात याच महाविद्यालयातील हर्षद निखार, क्ले मॉडलिंग प्रकारात श्री मथुरादास मोहता कॉलेज मधील अरीमल प्रजापती, रांगोळी प्रकारात गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड डिझाईन मधील वैशाली शिरभाते, मेहंदी प्रकारात ललित कला विभागातील उत्कर्षा बोकडे, ऑन स्पॉट फोटोग्राफी प्रकारात व्ही. एन. शासकीय कला, सामाजिक विज्ञान संस्था नागपूर येथील हर्षित भैय्या यांची निवड करण्यात आली. साहित्यिक गटातील वादविवाद प्रकारात हिस्लॉप कॉलेजचे मेहंदी शेख व ब्रायन डोंगरदिवे तर प्रश्नमंजुषा प्रकारात जी. एस. कॉलेजचा प्रथमेश लांजेवार, रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील शंतनू चटर्जी व हिस्लाप कॉलेजची अनुष्का नाग यांची निवड करण्यात आली. नाटक गटातील मिमिक्री प्रकारात मानसशास्त्र विभागातील एपी अमन तर एकपात्री अभिनय प्रकारात एलईडी कॉलेजचे आर्या चोपडे, वेदश्री राजूरकर, हिस्लॉप कॉलेज मधील शितल अन्सारी, गायत्री श्रीरंगपुरे, मोहित सरकार, रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील हर्ष दयारामानी, व्हीएमव्ही कॉलेजचे जयंत कुर्जेकर व कुणाल मेश्राम यांची निवड करण्यात आली आहे. आंतर विद्यापीठ सांस्कृतिक स्पर्धेकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन केले आहे.





## ज्ञानस्त्रोत केंद्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ज्ञानस्त्रोत्र केंद्र येथे बुधवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५५ वा पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस ज्ञानस्त्रोत्र केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. पूजा दाढे, श्री. सुरेश रंदई यांच्या सह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे कंपन्यांमध्ये निवडीचे प्रमाण वाढवा

## कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे शिक्षकांना आवाहन

## टीसीएस व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची कार्यशाळा






विविध कंपन्यांमध्ये पारंपारिक अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या निवडीचे प्रमाण वाढवा, असे आवाहन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी शिक्षकांना केले. विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने टीसीएस सोबत समन्वयाने गुरुनानक भवन येथे गुरुवार, दिनांक १३ ऑक्टोंबर २०२३ रोजी विद्यार्थी व शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित केली. यावेळी कुलगुरूंनी शिक्षकांसोबत संवाद साधला.

पारंपारिक अभ्यासक्रमांमधील कौशल्य प्राप्त विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रामध्ये देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना ही माहिती मिळावी म्हणून या कार्यशाळेचे आयोजन रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने केले आहे. शिक्षण प्राप्त केल्यानंतर विद्यार्थ्यांना स्वबळावर उभे करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांना रोजगार संबंधी योग्य मार्गदर्शन महाविद्यालयातून प्राप्त या अनुषंगाने ही कार्यशाळा आयोजित केल्याचे कुलगुरू डॉ. चौधरी यांनी सांगितले. कंपनी समोर मुलाखतीपूर्वी विद्यार्थ्यांची संपूर्ण तयारी करून घ्या. विद्यार्थी व कंपनी दरम्यान असलेली दरी दूर करण्याचे काम शिक्षकांना करावयाचे आहे. टीसीएस कंपनीमध्ये निवड झालेल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असल्याचे देखील त्यांनी सांगितले. यावेळी टीसीएस टीमचे कुलगुरूंनी आभार मानले. यावेळी कार्यशाळेकरिता टीसीएसचे अकॅडमी इंटरफेस प्रोग्राम रीजनल हेड श्री. सौरभ लखोटे, बँकिंग फायनान्स बिजनेस युनिट (बीएएफएसआय) चे श्री. सागर बागडे, कॉग्निटिव्ह बिझनेस युनिट (सीबीओ) श्री. रितेश कुमार, कॉग्निटिव्ह बिझनेस युनिटचे श्री. पियुष अग्रवाल, गौरी दुर्गे, विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, अनिकेत गजबे उपस्थित होते. कला, वाणिज्य, विज्ञान आदी अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांना माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळाव्यात म्हणून या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.





## कौशल्य प्राप्त विद्यार्थी यशस्वी होतो - डॉ. दुधे

आपणाकडे कौशल्य असेल तर आपण जीवनात शंभर टक्के यशस्वी होतो, असे प्रतिपादन प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी टीसीएस व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित 'करियर अस्पिरेशन वर्कशॉप' व 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' या कार्यशाळेत केले. वर्तमान स्थितीमध्ये कंपन्यांना कौशल्य प्राप्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणतेही एक कौशल्य प्राप्त करावे. आपणामध्ये क्षमता आहे. नोकरी मिळविण्याची मार्ग असतात. मात्र, आपणास माहिती नसते. नोकरीचे हे मार्ग दाखविण्यासाठी आपणासोबत टीसीएस आले असल्याचे डॉ. दुधे म्हणाले.

## भंडारा व वर्धा येथे आयोजन

भंडारा जिल्ह्यातील विद्यार्थी व शिक्षकांसाठी ही कार्यशाळा शुक्रवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी जे. एम. पटेल कॉलेज भंडारा येथे सकाळी ९ वाजता पासून होणार आहे. सकाळी ९ ते १२ दरम्यान विद्यार्थ्यांसाठी 'करियर अस्पिरेशन वर्कशॉप' तर दुपारी १२ ते २.३० दरम्यान शिक्षकांसाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' होणार आहे. वर्धा जिल्ह्यातील विद्यार्थी व शिक्षकांसाठी यशवंत महाविद्यालय येथे सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ रोजी कार्यशाळा होणार आहे. सकाळी १० ते १ दरम्यान विद्यार्थ्यांसाठी 'करियर अस्पिरेशन वर्कशॉप' तर दुपारी २ ते ४ दरम्यान शिक्षकांसाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' होणार आहे.

## विद्यापीठात भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी सहा. कुलसचिव गणेश कुमकुमवार यांनी भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला राहुल भगत, प्रणय रामटेके, हर्षल देठे यांच्यासह अन्य उपस्थित होते.









## दक्षता घेत सुरळीत परीक्षा घ्या - डॉ. संजय दुधे
## परीक्षा भवनात प्राचार्य, केंद्राधिकारी यांची बैठक

हिवाळी परीक्षा दक्षता घेत सुरळीत पार पाडण्याचे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.संजय दुधे यांनी केले आहे. विद्यापीठाच्या परीक्षा सोमवार, दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३ पासून सुरू होत आहे. हिवाळी परीक्षेचे नियोजन करण्यासाठी परीक्षा भवन येथे प्राचार्य, केंद्राधिकारी यांची बैठक प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोंबर २०२३ रोजी पार पडली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

परीक्षा केंद्रावरील केंद्राधिकारी यांनी कडक असले पाहिजे. तरच तुमच्या केंद्रावरील परीक्षा व्यवस्थित होऊ शकते. केंद्रावरील पर्यवेक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक योग्य प्रकारे तपासून घ्यावे. उत्तर पत्रिका तपासून घ्याव्यात, असे प्र-कुलगुरु डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. परीक्षा केंद्रावर स्वच्छता असावी. विद्यापीठाने निश्चित केलेल्या सुविधा परीक्षा केंद्रावर उपलब्ध करून द्याव्यात. परीक्षेच्या माध्यमातून प्रतिभा निर्माण करण्याचे काम शिक्षकांचे आहे. त्यामुळे कोणतेही गालबोट न लागता परीक्षा सुरळीत पार पाळण्याचे आवाहन त्यांनी केले. आगामी हिवाळी परीक्षेत २.५० लाख विद्यार्थी परीक्षा देणार असल्याची माहिती देताना परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी दिली. हिवाळी परीक्षेकरिता एकूण १२७ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे. नागपूर शहर ३५, नागपूर ग्रामीण ३५, भंडारा १७, वर्धा २३ व गोंदिया १७ अशी परीक्षा केंद्रे राहणार आहेत. उन्हाळी परीक्षेच्या तुलनेत हिवाळी परीक्षेत सहा केंद्र कमी करण्यात आले आहे. महाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या परीक्षेकरिता विद्यापीठाकडून प्रश्नपत्रिका दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. चार टप्प्यांमध्ये हिवाळी परीक्षा होणार असून विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक व्यवस्थित तपासून घेण्याचे आवाहन केले. झालेल्या चुका वेळेत दुरुस्ती कराव्या त्याचप्रमाणे परीक्षा केंद्रावर आलेल्या विद्यार्थ्यांकडून सायकल स्टॅण्डचे पैसे घेऊ नये. परीक्षा केंद्रावर परीक्षा देण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची केंद्रप्रमुखांनी काळजी घ्यावी अशा सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. साबळे यांनी दिल्या. यावेळी उपकुलसचिव परीक्षा नवीन परशुराम मुंगळे, मोतीराम तडस, सहाय्यक कुलसचिव धनुसिंग पवार, नितीन कडबे, राजेंद्र पाठक यांची उपस्थिती होती.

### नकलेची १०७० प्रकरणे

उन्हाळी २०२३ परीक्षेत विद्यापीठात एकूण १०७० नकल प्रकरण समोर आली आहे. यामध्ये सर्वाधिक ६०९ प्रकरणे ही एकट्या भंडारा जिल्ह्यातील आहे. नागपूर मध्ये १४५, गोंदिया जिल्ह्यामध्ये ३०४ तर वर्धा जिल्ह्यात १२ प्रकरणे आढळून आली आहेत.




## निसर्ग हीच मोठी संशोधन संस्था - डॉ. सुभाष चौधरी
## विद्यापीठात तृणधान्य विषयावरील राष्ट्रीय परिषद

निसर्ग हीच मोठी संशोधन संस्था असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृह येथे सोमवार, दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३ रोजी तृणधान्य वापरातून 'चांगले आरोग्य व भविष्य' विषयावर राष्ट्रीय परिषद पार पडली. यावेळी अध्यक्ष स्थानावरून डॉ. चौधरी बोलत होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, होम इकॉनॉमिक्स असोसिएशन नागपूर, श्री निकेतन कला, वाणिज्य महाविद्यालय नागपूर व व्हीएमव्ही वाणिज्य, जेएमटी कला आणि जेजेपी विज्ञान महाविद्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर, शिक्षणतज्ञ तथा तृणधान्य सल्लागार डॉ. लता रामास्वामी, श्री निकेतन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीपाद गंधे, होम इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या उपाध्यक्ष डॉ. वैजयंती देशपांडे, नागपूर गुजराती मंडळाचे नरेंद्र झा, डॉ. अभय मुद्गल यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय परिषदेत पुढे बोलताना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी आपल्या शरीरराचे उदाहरण देत निसर्गातील प्रत्येक घटकाचा यावर परिणाम होत असल्याचे सांगितले. निसर्गातील प्रत्येक घटकाचा संबंध शरीराशी येतो. आपल्या शरीरामध्ये किती विविध घटक आहेत. प्रत्येक घटक निसर्गावर अवलंबून आहे. निसर्ग हाच ज्ञानाचा भांडार आहे. ज्ञान येथेच आहे, केवळ आपणास अज्ञानाचा पडदा दूर करण्याची गरज असल्याचे कुलगुरू म्हणाले. भारत हा विविध संस्कृती, धार्मिक आणि अध्यात्मिक प्रगतीचा देश आहे. आपली भारतीय संस्कृती परंपरा आजही कायम आहेत. विविध प्राचीन ग्रंथ, वेद इथे आहे. जगातील सारे ज्ञान, रहस्य वेदांमध्ये असून त्याचे संशोधन व्हावे असे ते म्हणाले. त्याकाळी ऋषींनी केलेले संशोधन वेदांमधून दिसून येते. वेद हे संशोधनांचा सारांश असल्याचे कुलगुरू म्हणाले. शरीर निर्मिती ही निसर्गाशी संबंधित बाब आहे. मात्र, शरीराची ठेवण हे आपणावर अवलंबून आहे. शरीराच्या ठेवण्याबाबत आहार, नियम, व्यायाम या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यात आहारामध्ये तीन प्रकारचे अन्न असून सकारात्मक, नकारात्मक आणि तटस्थ समावेश आहे. सकारात्मक अन्न हे औषधीय गुणधर्माचे काम करते असे कुलगुरू म्हणाले. तृणधान्य हे या प्रकारातीलच एक महत्त्वाचा घटक असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. देश, समाजासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केल्याने आयोजकांचे कुलगुरूंनी अभिनंदन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी तृणधान्य पिकातील विविध प्रकाराबाबत माहिती दिली. कंगनी, रागी, राजगिरा, भगर, ज्वारी, बाजरी, कुटकी, कोडो, मक्का आदी विविध तृणभाज्यांची वैशिष्ट्ये त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितली. शरीरातील सर्व अंतर्गत भाग स्वच्छ करण्याचे काम भगर करीत असल्याचे ते म्हणाले. तृणधान्य प्रकारातील कुटकी हे प्रजनन तर कोडो हे रक्ताच्या कर्करोगावर गुणकारी असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच तृणधान्यामधील विविध घटकांची माहिती त्यांनी दिली. तृणधान्य सल्लागार डॉ. लता रामास्वामी यांनी मिलेट्स मॅन ऑफ इंडिया डॉ. बी. एम. हेगडे यांच्या विषयी माहिती दिली. बदलत्या जीवनशैलीचा परिणाम आजारांना आमंत्रण देणारा ठरत आहे. त्यामुळे पौष्टिक असलेले तृणधान्याचा आठवड्यातून दोनदा तरी किमान वापर करावा. आपल्या आहारामध्ये कार्बोदके, प्रथिने, खनिजे किती प्रमाणात असावीत याची माहिती देत कोणत्या घटकांमध्ये काय आहे याची विस्तृत माहिती त्यांनी दिली.

या राष्ट्रीय परिषदेचे संयोजक म्हणून डॉ. श्रीबाला देशपांडे व प्राचार्य डॉ. अभय मुद्गल यांनी जबाबदारी सांभाळली. संयोजन समिती सचिव म्हणून डॉ. कांचन जोशी, डॉ. चेतना भट्ट, डॉ. सीमा पांडे तर मार्गदर्शक समितीमध्ये डॉ. एम. सी. मेश्राम, श्री. प्रदीप बिनीवाले, डॉ. मृणाल वलीवकर, डॉ. शाहीदा शेख, श्री. प्रसाद गंधे, ॲड. संजयभाई ठाकर यांचा समावेश होता. परिषदे करिता साधारणता २५० च्या आसपास प्रतिनिधींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन माधुरी तिवारी, डॉ. राजेंद्र मालोकार यांनी केले तर आभार डॉ. कांचन जोशी यांनी मानले.



## एलएडी महाविद्यालय ठरले अजिंक्य
### आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत दमदार खेळाच्या महिला गटात एलएडी महाविद्यालयाने अजिंक्यपद प्राप्त केले. रवी नगरातील विद्यापीठाच्या मैदानावर स्पर्धेतील अंतिम लढत एलएडी विरुद्ध रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालय (आरसीओइएम) संघासोबत झाला. यात एलएडी संघाने ५३-४३ ने विजय मिळविला. विजयी संघाच्या स्वाती वानखेडेने सर्वाधिक २७ गुणांचे योगदान दिले.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत सिटी प्रिमियर महाविद्यालय (सीपीसी) संघाने वायसीसीई संघाला २१-९ ने पराभव करीत बाजी मारली. सामन्यात सर्वाधिक १२ गुणांचे योगदान दिले. यावेळी स्पर्धेतील विजेत्या संघाला पुरस्कृत करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. धनंजय वेळुकर, रायसोनी समूहाचे संचालक डॉ. आरती देशपांडे, डॉ. नितीन जंगीटवार, प्रा. अरविंद गरुड आदी उपस्थित होते.

## नैतिकतेवर संशोधनाचा पाया टिकून
### माजी प्र-कुलगुरू
### डॉ. विजयकुमार चौबे यांचे प्रतिपादन

कोणत्याही संशोधनाचा पाया हा नैतिकतेवर टिकून असतो, असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. विजयकुमार चौबे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागात शुक्रवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित अतिथी व्याख्यान देताना डॉ. चौबे बोलत होते. यावेळी विभाग प्रमुख डॉ. राजेश सिंग उपस्थित होते.

सांख्यिकी विभागात 'संशोधनातील नैतिकता, पेटंट आणि पब्लिकेशन' या विषयावर अतिथी व्याख्यान करताना डॉ. विजयकुमार चौबे यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. सांख्यिकी विषयांमधील संशोधन, बौद्धिक मालमत्ता अधिकार (आयपीआर), त्याचप्रमाणे पेटंट मिळत असताना संशोधनातील नैतिकता याबाबत त्यांनी माहिती दिली. पेटंट कोणाला मिळवता येते. तसेच पेटंट कशाप्रकारे घ्यायचे यावर विविध उदाहरणे देत त्यांनी मार्गदर्शन केले. संशोधन करताना ऑनलाईन संदर्भ घेण्याचे टाळावे. पेटंट प्राप्त करताना अनेकदा संशोधनांमध्ये चौर्यकर्म झाल्याचे निदर्शनास येते. त्यानंतर अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे सामाजिक समस्या शोधून काढत स्वतः संशोधन करीत पेटंट प्राप्त करावे. याकरिता ऑनलाइन पेक्षा तज्ञ व्यक्तींकडून ऑफलाइन संदर्भ घेतल्यास संशोधन अथवा पेटंटला अधिक महत्त्व प्राप्त होते, असे डॉ. चौबे यांनी त्यांच्या व्याख्यानादरम्यान सांगितले. शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी संशोधन, पेटंट बाबत असलेल्या त्यांच्या समस्यांचे निराकरण करून घेतले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे डॉ. चौबे यांनी दिली.








## उद्योजिका महोत्सवात सतनाम कौरला द्वितीय पुरस्कार भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थिनीला सन्मान

उद्योजिका स्वावलंबन महोत्सवात भौतिकशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थिनी सतनामकौर मट्टू हिने द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला. विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, महिला उद्योजकता शाखा व बॅरिस्टर शेषराव वानखेडे संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती कुसुमताई वानखेडे यांच्या स्मृतिपित्यर्थ या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सतनाम कौर हिला विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन महिला उद्योजकता शाखेच्या अध्यक्ष रश्मी कुळकर्णी, सचिव योगिता देशमुख, संतोष मोरे, प्रकल्प संचालक अमरदीप कौर व तेजल रक्षमवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. 'नवकल्पनांच्या उद्दिष्टांसह शाश्वत विकास' या विषयावर ही स्टार्टअप स्पर्धा घेण्यात आली होती. सतनामने तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने खेळण्याप्रमाणे असलेले मॉडल पीपीटीद्वारे सादर केले. सतनाम कौर मट्टू ही भौतिक शास्त्र विभागातील पीएचडी संशोधक विद्यार्थिनी आहे. सतनाम ही विभागातील डॉ. अभय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पूर्ण करीत आहे. पुरस्कार प्राप्त केलेल्या विषयांमध्येच ती स्टार्टअप करीत आहे. या स्पर्धेमध्ये सतनाम हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याने विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर, डॉ. अभय देशमुख यांनी तिचे अभिनंदन केले.









## रवींद्रनाथ टागोर यांचा राष्ट्रवाद मानवतावादी कोलकाता येथील डॉ. सुबीर धार यांचे प्रतिपादन - विद्यापीठात राष्ट्रसंत व्याख्यानमाला

स्वातंत्र्यपूर्व काळातील नोबेल पुरस्कार प्राप्त साहित्यिक रवींद्रनाथ टागोर यांची राष्ट्रवादाची संकल्पना मानवतावादी होती, असे प्रतिपादन इंग्रजीचे माजी प्राध्यापक आणि संचालक, भाषा आणि संस्कृती विद्यालय, रवींद्र भारती विद्यापीठ कोलकाता येथील प्रा. सुबीर धार यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवानिमित्त पदव्युत्तर इंग्रजी विभागाद्वारे राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे आयोजन जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहातर सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी डॉ. धार बोलत होते. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले तर मंचावर मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पवळेकर उपस्थित होते.

रवींद्रनाथ टागोर ऑन नॅशनॅलिझम अ‍ॅण्ड ह्युमॅनिजम' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. सुबीर धार यांनी भारतामध्ये साहित्य क्षेत्रातून राष्ट्रवादाची संकल्पना कशी विकसित झाली याची माहिती दिली. भारत आणि पाश्चिमात्य साहित्यिकांनी राष्ट्रवादाची संकल्पना कशा प्रकारे विकसित केली याची माहिती यावेळी त्यांनी दिली. इंग्रजी साहित्यिक शेक्सपियर यांच्या साहित्यामध्ये इंग्लंडमधील लोक संस्कृतीनुसार देशाची व्याख्या केली गेली आहे. इंग्लंड येथील तत्कालीन सामाजिक आणि राजकीय स्थितीवर राष्ट्रवाद अर्थात देशाची व्याख्या शेक्सपियरने केली होती. याप्रकारे भारतामध्ये देखील साहित्य क्षेत्रातील व्यक्तींकडून देशाची व व्याख्या कशाप्रकारे केल्या गेली याचे उदाहरण डॉ. धार यांनी दिले. मुगल साम्राज्य काळात देश ही संकल्पना नव्हती.

भारतामध्ये १८५७ स्वातंत्र्य युद्धानंतर प्रथम देश म्हणून विचार करण्यास सुरुवात झाली. यावेळी डॉक्टर धार यांनी बंगालच्या फाळणीचे उदाहरण दिले. बंगालच्या फाळणीच्या निर्णयाची घोषणा १९ जुलै १९०५ रोजी भारताचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी केली होती. १६ ऑक्टोंबर १९०५ पासून फाळणीला सुरुवात झाली. या घटनेनंतर बंगालमधील सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 'बॉयकॉट ब्रिटिश' हा नारा दिला होता. रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या रचनेमधून राष्ट्र अर्थात देश याविषयी भावना व्यक्त केली. रवींद्रनाथ टागोर यांची राष्ट्रीयतेची व्याख्या तळागळाशी जुळलेली होती. तत्कालीन स्थितीमध्ये मातृभूमी अर्थात माता केंद्रबिंदू ठरली. मातृभूमीच्या मुलांनी मातेसाठी एकत्र आले पाहिजे ही भावना साहित्यातून निर्माण केली गेली. बंगालमधील तत्कालीन स्थितीत १९०८ मध्ये रवींद्रनाथ टागोर हे राष्ट्रवादाकडे वळले. १९१० ते १९२३ दरम्यान तत्कालीन धोरणे, पिळवणूक या विरोधात जनतेचा आक्रोश म्हणून रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यात राष्ट्रवादाची भूमिका आणखी प्रखर होत गेली. त्यांनी त्यांच्या कवितेमधून राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. वेद, उपनिषदांमध्ये असलेली मानवता रवींद्रनाथ टागोर यांच्या राष्ट्रवादामध्ये दिसून येत होती. मात्र, विश्व महायुद्धाच्या काळात आपण आपल्या देशाच्या राष्ट्रवादाबाबत बोलत राहिलो तर ती आत्महत्या ठरेल, असे म्हणत संपूर्ण जगात मानवतावादी राष्ट्रवादाचा पुरस्कार रवींद्रनाथ टागोर यांनी केला होता असे डॉ. धार म्हणाले.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या राष्ट्रवाद व मानवतावादी दृष्टिकोनाची माहिती त्यांच्या साहित्यातून प्रकट होत असल्याचे डॉ. धार यांनी त्यांच्या व्याख्यानातून दिल्याचे सांगितले. रवींद्रनाथ टागोर हे महान साहित्यिक मोठे कवी होते. साहित्यामधील प्रथम नोबेल पुरस्कार मिळवणारे ते गैर युरोपियन होते असे डॉ. दुधे यांनी सांगितले. नवीन पिढीने रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यापासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पळवेकर यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. अक्षरा रोहनकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. रिमा खराबे यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मानले. कार्यक्रमाला प्राधिकारणी सदस्य, विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## रायसोनी, डॉ. आंबेडकर, एनएफएस, रामदेवबाबा महाविद्यालय उपांत्यफेरीत आंतर महाविद्यालयीन टेबलटेनिस स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे आयोजित आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत जीएच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल फायर सव्हिस, रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयाने उपांत्यफेरीत धडक दिली.

रवी नगरातील विद्यापीठाच्या टेबलटेनिस सभागृहात सुरु झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य वामनराव तुर्के यांच्या हस्ते सिनेट सदस्य डॉ. पायल ठावरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एमएसटीटीएचे सचिव ॲड. आशुतोष पोतनीस यांनी भुषविले. याप्रसंगी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, मुख्य पंच दीपक कानेटकर, अजय कांबळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी स्पर्धेसाठी सहभाग नोंदविलेल्या महाविद्यालयाचे चार गटात विभाजन करण्यात आले.

अ गटात रायसोनी महाविद्यालयाने किशोरीताई भोयर फार्मसी महाविद्यालयाला ३-० ने मात देत उपांत्यफेरी गाठली. यात विजयी संघाकडून अभिराज शिलेदारने ११-४, १४-१२, ११-८ ने आयुष पावेलकरला, वैभव केशरीने ११-५, ११-७, ११-७ ने यश ठाकरेला आणि सुहास मुसलेने कार्तिकेश बावनकरला ११-४, ११-९, ११-६ ने नमवित संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. ब गटात झालेल्या सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघाने जेसीपीईचा ३-१ ने पराभव केला. यात आदी चिटणीसने ओम तिवारीचा ११-६, ११-८, ११-६ ने , जयेश कुळकर्णीने ११-२, ११-१, ११-१ ने निखिल बावनेचा पराभव करीत २-० अशी गुणसंख्या केली. नंतर शार्दुल पोलकेला केयूर पाणबुडेकडून ११-८, ८-११, ९-११, ९-११ ने पराभव स्वीकारवा लागला. मात्र शेवटी आदीने निखिलचा ११-१, ११-३, ११-५ ने पराभव करीत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. क गटात नॅशनल फायर सव्हिसने हिस्लॉप कॉलेजचा ३-१ ने पराभव केला. विजयी संघाकडून पहिली फेरी हिमांशू कुमारला जिजस ट्रॅवसोकडून ९-११, ३-११, १०-१२ ने पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर गायन राजनने एन क्रुझला ११-९, ११-४, ११-४ ने हर्ष पामपट्टीवारने जॉर्ज झाल्कोला ७-११, ११-६, ११-७, १२-१० ने नमवित संघाच्या विजयात मोलाची भुमिका निभावली. तर ड गटात झालेल्या लढतीत रामदेवबाबा कॉलेजने तायवाडे कॉलेजला ३-० ने नमवित उपांत्यफेरी गाठली. विजयी संघाकडून एकेरीत आनंद मराठेने अर्णव बडोलेला ११-३, ११-४, ११-१ ने तर आदित्य शरनवेने जयेश देशमुखचा ११-४, ११-३, ११-३ ने आणि वारण्य पौनीकरने जयेश रातबोलेला ११-०, ११-१, ११-५ ने नमवित संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले.

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-10-01 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# डोपिंगमुळे खेळाडूसह प्रशिक्षकांची कारकीर्दही संपते

• डॉ. संजोगीता सुदन यांचे प्रतिपादन • विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे आयोजन



डॉ. संजोगीता सुदन यांचे स्वागत करताना डॉ. शरद सूर्यवंशी. सोबत इतर मान्यवर

◆ नागपूर, ३० सप्टेंबर
डोपिंगमध्ये सापडल्यानंतर त्या खेळाडूचे स्पोर्ट्स करिअर तर संपतेच, शिवाय त्याच्या प्रशिक्षकांची क्रीडा कारकीर्दही संपते. शिवाय समाजात असलेली पालकांची प्रतिष्ठाही नाहीशी होते, असे प्रतिपादन नॅशनल अँण्टीडोपिंग एजन्सीच्या मुख्य अधिकारी तसेच भारतीय बॉक्सिंग कौन्सिल मेडिकल कमिशनच्या अध्यक्षा डॉ. संजोगीता सुदन यांनी केले.

नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने डोपिंगमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती विषयावर अतिथीय व्याख्यानाचे आयोजन रविनगरातील विद्यापीठाच्या क्रीडा विभाग कार्यालयात करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी बोलताना डॉ. सुदन म्हणाल्या, डोपिंगमुळे खेळाडूंच्या शरीरावरदेखील मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होतो. किडनी फेलीवर, हार्ट अटॅकसारख्या दुर्घटना त्यांच्यासोबत होऊ शकतात. या सर्वांपासून दूर राहण्यासाठी सर्व खेळाडूंनी भरडधान्य आणि भारतीय आहार पद्धतीचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नॅशनल अँण्टीडोपिंग एजन्सी यापुढे रिजनल अँण्टीडोपिंग एजन्सीसाठी प्रयत्नरत आहेत. नागपूर विद्यापीठाने यासाठी पुढाकार घ्यावा. विद्यापीठाच्या परिसरात अद्ययावत सुविधा असणारे स्पोर्ट्स सायन्स सेंटर आणि विद्यार्थ्यांना नियमित डोपिंगविषयी मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांची नियुक्ती करावी, असा आग्रह त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला केला.

याप्रसंगी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांच्या हस्ते डॉ. संजोगीता यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र टेबल टेनिस असोसिएशनचे सचिव अॅड. आशुतोष पोतनीस, एमबीएचे अध्यक्ष डॉ. धनंजय वेळुकर, जिल्हा अॅथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे, डॉ. नितीन जंगीटवार, डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंह, अर्चना कोट्टेवार, अॅथलेटिक्स प्रशिक्षक जितेंद्र घोरदडेकर, बेसबॉलपटू गणेश वाणी, फ्लोअरबॉल विद्यापीठ संघाची कर्णधार ऋतिका किन्हेकर, नितीन धाबेकर आदी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments

TheHitavada
Nagpur City Line | 2023-10-02 | Page- 5
ehitavada.com

# Dr Jugade to receive ACT Best PG Chemistry Teacher Award

■ Staff Reporter

ALL India Association of Chemistry Teachers (ACT) will be conferring Best Post Graduate Chemistry Teacher Award upon Dr Ravin Jugade, Professor in Analytical Chemistry, Post Graduate Department of Chemistry, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU). The ACT awards are presented to the Outstanding Chemistry Teachers of the country during National Convention of Chemistry Teachers to be held between October 27 and October 29 at Ahmedabad.



Prof Jugade is the last PhD student of Prof A P Joshi who also is receiving Lifetime Achievement Award in the same function.

Prof Jugade has been selected for ACT Prof Dr Bhupendra Sahai Saxena Award for Best PG Chemistry Teacher. He has 75 publications to his credit. He has guided 9 research students for PhD and has authored 6 text books for BSc classes and one reference book by National publisher.

Presently, he is Chairman of Board of Studies in Chemistry of RTMNU.

Recently, he was honoured with Best Researcher Award by RTMNU at the hands of Maharashtra Governor Ramesh Bais. He has extended heartfelt gratitude towards Dr Brijesh Pare, President of ACT and Prof D V Prabhu, General Secretary to ACT.

Special acknowledgement have been conveyed to organising committee members Dr H M Pande and Dr W B Gurnule for proposing these nominations from ACT-West Zone.

# डोपिंग से खिलाड़ियों के साथ प्रशिक्षकों का भी नुकसान

भास्कर खेल | नागपुर

नागपुर विश्वविद्यालय के खेल विभाग द्वारा आयोजित समारोह में डॉ संजोगिता सुदन का दावा



डोपिंग का दोषी पाए जाने के बाद एक बार एथलीट का खेल करियर खत्म हो जाता है, तो उसके कोचों का खेल करियर भी खत्म हो जाता है। इसके अलावा, समाज में माता-पिता की प्रतिष्ठा भी खत्म हो जाती है, यह बात राष्ट्रीय डोपिंग रोधी एजेंसी के मुख्य अधिकारी और भारतीय मुक्केबाजी परिषद चिकित्सा आयोग की अध्यक्ष डॉ. संजोगिता सुदन ने कही है। राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के खेल विभाग ने रविनगर स्थित विश्वविद्यालय के खेल विभाग कार्यालय में डोपिंग के दुष्प्रभावों की जानकारी पर एक अतिथि व्याख्यान का आयोजन किया। उस समय डॉ. सुदन बोल रही थी।

इस अवसर पर बोलते हुए डॉ. ... अटैक जैसी दुर्घटनाएं भी हो सकती हैं। पुरुषों के शरीर के अंग महिलाओं की तरह विकसित होते हैं। वहीं महिलाएं ... मिलते हैं। उन्होंने सभी खिलाड़ियों से इन सब से दूर रहने के लिए साबुत अनाज और भारतीय आहार का उपयोग करने का आग्रह किया। राष्ट्रीय डोपिंग ... एजेंसियों के लिए प्रयास कर रही हैं। इस अवसर पर बोलते हुए उन्होंने इच्छा व्यक्त की कि नागपुर विश्वविद्यालय इस दृष्टि से प्रयास करने की पहल करे। उन्होंने विश्वविद्यालय प्रशासन से विश्वविद्यालय परिसर में आधुनिक सुविधाओं वाला एक खेल विज्ञान केंद्र स्थापित करने और छात्रों को नियमित डोपिंग पर मार्गदर्शन करने के लिए विशेषज्ञ मार्गदर्शकों की नियुक्ति करने का भी आग्रह किया।

नागपुर विश्वविद्यालय खेल विभाग के निदेशक डॉ. शरद सूर्यवंशी द्वारा डॉ. संजोगिता को सम्मानित किया गया। इस अवसर पर महाराष्ट्र टेबल टेनिस एसोसिएशन के सचिव एड. आशुतोष पोटनीस, नागपुर विवि के पूर्व क्रीड़ा संचालक डॉ. धनंजय वेलुकर, नागपुर जिला एथलेटिक्स एसोसिएशन के अध्यक्ष गुरुदेव नागरले आदि उपस्थित थे।

देशोन्नती

# विकास हेच डी. लक्ष्मीनारायण यांचे ध्येय

▸▸ प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन ▸▸ रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...



माहिती देताना त्यांनी त्यांची जमीन विद्यापीठाला दान दिल्याचे सांगितले. लोकांकरिता नवनवीन तंत्रज्ञान निर्माण करून देश विकासात हातभार लागावा, असे

नागपूर ■ समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा हेच रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांचे विचार होते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील जमनालाल बजाज ...

विचार करणारे काही लोक होते. त्याच महामानवांमध्ये रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांचा समावेश आहे. शिक्षण घेतले पाहिजे, असे कोणालाही वाटत नव्हते. त्याकाळी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी तंत्रसंस्था उभारण्यासाठी मोलाची मदत केली. तत्कालीन काळामध्ये सेवाभाव महत्त्वाचा मानला जात होता. अशाच काळात रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी त्यांची संपत्ती जनतेच्या स्वाधीन केली. आपणासोबतच दुसऱ्यांचा विकास करण्याचा प्रयत्न व्हावा म्हणून या महामानवांनी लोकांकरिता शैक्षणिक दालन खुले केले. आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या शिक्षकांनीदेखील समाजाच्या विकासासाठी कार्य करता येईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याकरिता डी. लक्ष्मीनारायण यांच्यासारखी समाजसेवेची प्रवृत्ती पाहिजे, असे डॉ. दुधे म्हणाले. रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी दिलेल्या जमिनीवर विद्यापीठ तसेच लक्ष्मीनारायण तंत्रसंस्था उभी राहिल्याचे ते म्हणाले. तत्पूर्वी विद्यापीठाच्या वतीने प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करीत अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालिवाल, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडु, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह संचालक, विविध विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# जगात अराजकता; पुन्हा गांधी विचारांची गरज

कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन

लोकसत्ता खास प्रतिनिधी



नागपूर : सत्य, अहिंसा, समानता याचे प्रतीक असलेले महात्मा गांधी हे देशातच नव्हे तर जगमान्य आहेत. जगात आज युद्ध, अराजकता, दंगल सुरू असून पुन्हा एकदा गांधीजींच्या विचारांची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने सोमवारी आयोजित महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर उपस्थित होते. कुलगुरू म्हणाले, इंग्रजांचे कारखाने बंद पडावे म्हणून घरीच सूतकताई करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. एवढेच नव्हे तर सूतकताईला गती मिळावी म्हणून नवीन तंत्रज्ञान वापरत मशीनद्वारे देखील सूतकताई करण्यास त्यांनी प्राधान्य दिले होते. नवीन तंत्रज्ञानाचा वापर होत असताना प्रत्येक हाताला रोजगार देखील मिळावा, असे महात्मा गांधी यांचे विचार होते. प्रत्येकाचे दरडोई उत्पन्न वाढले तरच देशाची प्रगती होईल. त्याकरिता आपणाकडे उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उद्योग उभारणीस प्राधान्य दिले पाहिजे. महात्मा गांधी यांच्या कार्य विचार व प्रेरणेतून स्थापन वर्धा येथील एमगिरी या संस्थेत नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उत्पादन वाढीवर संशोधन पूर्वीपासूनच होत असल्याचे कुलगुरू यांनी सांगितले.

कार्यक्रमात ठाकूरवाडा येथील ९९ वर्षीय ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी डॉ. पुंडलिकराव गेडाम यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या वतीने त्यांचे पुत्र ... हा सत्कार स्वीक...

03/10/2023 | Nagpur | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

# टागोरांच्या राष्ट्रीयतेची व्याख्या तळागाळाशी जुळलेली

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

**कोलकाता येथील डॉ. सुबीर धर यांचे प्रतिपादन**



'स्वातंत्र्यपूर्व काळातील नोबेल पुरस्कारप्राप्त साहित्यिक रवींद्रनाथ टागोर यांची राष्ट्रवादाची संकल्पना मानवतावादी होती. त्यांच्या राष्ट्रीयतेची व्याख्या तळागाळाशी जुळलेली होती,' असे प्रतिपादन रवींद्र भारती विद्यापीठ कोलकाता येथील प्रा. डॉ. सुबीर धर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवानिमित्त पदव्युत्तर इंग्रजी विभागाद्वारे आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमालेत ते बोलत होते.

'रवींद्रनाथ टागोर ऑन नॅशनॅलिझम अॅण्ड ह्युमॅनिझम,' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. धर यांनी भारतामध्ये साहित्य क्षेत्रातून राष्ट्रवादाची संकल्पना कशी विकसित झाली याची माहिती दिली. इंग्रजी साहित्यिक शेक्सपिअर यांच्या साहित्यामध्ये इंग्लंडमधील लोक संस्कृतीनुसार देशाची व्याख्या केली गेली आहे. इंग्लंडमधील तत्कालीन सामाजिक आणि राजकीय स्थितीवर राष्ट्रवाद अर्थात देशाची व्याख्या शेक्सपिअरने केली होती. याप्रकारे भारतामध्येदेखील साहित्य क्षेत्रातील व्यक्तींकडून देशाची व्याख्या कशाप्रकारे केली गेली याचे उदाहरण डॉ. धर यांनी दिले.

'मुघल साम्राज्य काळात देश ही संकल्पना नव्हती. भारतामध्ये १८५७च्या स्वातंत्र्य युद्धानंतर प्रथम देश म्हणून विचार करण्यास सुरुवात झाली. बंगालच्या फाळणीच्या निर्णयाची घोषणा १९ जुलै १९०५ रोजी भारताचे तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी केली होती. १६ ऑक्टोबर १९०५पासून फाळणीला सुरुवात झाली. या घटनेनंतर बंगालमधील सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 'बॉयकॉट ब्रिटिश' हा नारा दिला. रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या रचनेमधून राष्ट्र अर्थात देश याविषयी भावना व्यक्त केली. टागोर यांची राष्ट्रीयतेची व्याख्या तळागाळाशी जुळलेली होती. तत्कालीन स्थितीमध्ये मातृभूमी अर्थात माता केंद्रबिंदू ठरली. मातृभूमीच्या मुलांनी मातेसाठी एकत्र आले पाहिजे, ही भावना साहित्यातून निर्माण केली गेली. बंगालमधील तत्कालीन स्थितीत १९० मध्ये रवींद्रनाथ टागोर हे राष्ट्रवादाकडे वळले. १९१० ते १९२३ दरम्यान तत्कालीन धोरणे, पिळवणूक या विरोधात जनतेचा आक्रोश म्हणून टागोर यांच्या साहित्यात राष्ट्रवादाची भूमिका आणखी प्रखर होत गेली. त्यांनी त्यांच्या कवितेमधून राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. वेद, उपनिषदांमध्ये असलेली मानवता रवींद्रनाथ टागोर यांच्या राष्ट्रवादामध्ये दिसून येत होती. मात्र, विश्व महायुद्धाच्या काळात आपण आपल्या देशाच्या राष्ट्रवादाबाबत बोलत राहिलो तर ती आत्महत्या ठरेल,' डॉ. धर म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. संजय पळवेकर यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. अक्षरा रोहनकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. रिमा खराबे यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मानले. कार्यक्रमाला प्राधिकारणी सदस्य, विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# शेवटच्या घटकाचा विकास हेच डी. लक्ष्मीनारायण यांचे विचार : डॉ. संजय दुधे

नागपूर विद्यापीठात रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम



नागपूर : समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा, हेच रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांचे विचार होते, असे प्रतिपादन प्र-कलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाच्या सभागृहात शनिवारी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजु हिवसे यांची उपस्थिती होती. डॉ. दुधे म्हणाले, रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांनी त्यांची जमीन विद्यापीठाला दान दिली. लोकांकरिता नवनवीन तंत्रज्ञान निर्माण करून देशविकासात हातभार लागावा, असे विचार करणारे काही मोजकेच लोक होते. त्या महामानवांमध्ये रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांचा समावेश आहे. शिक्षण घेतले पाहिजे असे कोणालाही वाटत नव्हते, त्याकाळी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी तंत्रसंस्था उभारण्यास मोलाची मदत केली. तत्कालीन काळात सेवाभाव महत्त्वाचा मानला जात होता. अशा काळात रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी त्यांची संपत्ती जनतेच्या स्वाधीन केली. आपणासोबतच दुसऱ्यांचाही विकास करण्याचा प्रयत्न व्हावा म्हणून या महामानवाने लोकांसाठी शैक्षणिक दालन खुले केले.

आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या शिक्षकांनीदेखील समाजाच्या विकासासाठी काय करता येईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याकरिता डी. लक्ष्मीनारायण यांच्यासारखी समाजसेवेची प्रवृत्ती पाहिजे.

रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी दिलेल्या जमिनीवर विद्यापीठ व लक्ष्मीनारायण तंत्रसंस्था उभी राहिल्याचे डॉ. दुधे म्हणाले. तत्पूर्वी विद्यापीठाच्या वतीने डॉ. दुधे व कुलसचिव डॉ. हिवसे यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. यावेळी डॉ. प्रफुल्ल साबळे, हरीश पालीवाल, डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कविश्वर, डॉ. प्रशांत कडु, डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह इतरही मान्यवर उपस्थित होते.

Smart Nagpur Edition
Oct 1, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com

# डोपींगमुळे खेळाडू, कोचचे संपते करीअर

राष्ट्रीय डोपींग विरोधी एजेंसीच्या सीईओ डॉ.संजोगिता सुदन यांचे प्रतिपादन



नागपूर. डोपींगमध्ये दोषी आढळल्यास अॅथलीटसह प्रशिक्षकाचे करीअर संपते. समाजात त्यांच्या आईवडीलांची प्रतिष्ठाही संपते. शनिवारला रातुम नागपूर विद्यापीठाच्या क्रिडा विभागातर्फे रवीनगर येथील विभागाच्या कार्यालयात आयोजीत' डोपींगचे दुष्परिणाम' या विषयावर राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजेंसी(नाडा)च्या सीईओ आणि भारतीय मुष्टीयुध्द परिषद चिकित्सा आयोगाच्या अध्यक्ष डॉ. संजोगिता सुदन या बोलत होत्या.यावेळी त्यांनी उपस्थित खेळाडू, प्रशिक्षक व क्रिडा संघटनांना डोपिंगबद्दल माहिती दिली.

डॉ. सुदन म्हणाल्या, डोपिंगमुळे अॅथलीटच्या ... धोकाही वाढतो. पुरूषांचे शरीर महि... प्रमाणे विकसित होते. तर, महिल... पुरूषांप्रमाणे दाढी काढावी लागते. ...

नागपुर विद्यापीठ के खेल विभाग द्वारा व्याख्यान का आयोजन

# डोपिंग से खिलाड़ियों के साथ कोच का भी करिअर खत्म



भास्कर संवाददाता | नागपुर

नागपुर विद्यापीठ के खेल विभाग द्वारा आयोजित व्याख्यान में नेशनल एंटीडोपिंग एजेंसी के मुख्य अधिकारी और भारतीय बॉक्सिंग परिषद कौन्सिल मेडिकल कमिशन की अध्यक्ष डॉ. संजोगिता सुदन ने कहा कि, कोई खिलाड़ी डोपिंग में दोषी पाए जाने के ...

**पुरुषों में महिला जैसा होता है बदलाव**

डॉ. संजोगिता सुदन ने कहा कि डोपिंग का असर खिलाड़ियों के शरीर पर भी बड़े पैमाने पर पड़ता है। किडनी फेल, हार्ट अटैक जैसी दुर्घटनाएं भी हो सकती है। इससे पुरुषों के शरीर के कुछ अंग महिलाओं की तरह विकसित होते हैं। वहीं महिलाओं में पुरुषों की तरह दाढ़ी आना और कई तरह के बदलाव देखने को मिलते हैं। इन सबसे दूर रहकर खिलाड़ियों से भारतीय आहार पद्धति का उपयोग करने का आग्रह भी किया।

बात कर रही थी। कार्यक्रम में प्रमुख ... नितिन जंगिटवार, खेलो इंडिया ...

लोकमत समाचार

# आम आदमी समझ सके ऐसी तकनीक चाहिए

महात्मा गांधी व पूर्व प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री की मनाई जयंती

## सरकारी कार्यालयों में आयोजन

पुरस्कार विजेता विद्यार्थियों का सत्कार

मजबूती का नाम है गांधी

महोत्सव, महाजेनको

TheHitavada
Nagpur City Line | 2023-10-02 | Page- 7
ehitavada.com





Powered by iDocuments

TheHitavada
Nagpur City Line | 2023-10-02 | Page- 7
ehitavada.com

...here all Pancahyat Samiti ... Panchayats conducted one ...nliness drive.

## ...ptee Military Station

...onnel at Kamptee Military (KMS), Nagpur under the M&G Sub Area, undertook ... drive as part of the nation... ...chhata Hi Seva' campaign. ... commemorated the ninth ...ry of the Swachh Bharat ... aimed at encouraging vol... ...d collective efforts leading ...ndia'. Vegetable ...v Ghat were sani... ...ance and dispos... ...ramdaan'.

## ...NU

... National Service ...asant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) conducted a cleanliness drive at Gandhi Sagar Lake. Everyone should understand the importance of cleanliness and it will accelerate the development process said Vice Chancellor Dr Subhash Chaudhari. Dr Sanjay Dudhe, Dr Raju Hiwsey, Saurabh Khekde, Mahesh Dhamecha, Dr Sopnadev Pise, Nitin Verma, Manoj Sable and others were prominently present during the cleanliness drive.

## NADP

NATIONAL Academy of Defence Production (NADP) as part of its cleanliness drive initiated a tree plantation drive at the Rashtriya Drishtiyon Shikshan Camp and Punarvasan Sanstha's Andh Vidyalaya in Nagalwadi. This programme was marked by 'Ek ghanta ek tareekh shramdaan', where participants dedicated an hour to serve the cause of

देशोन्नती

# हजारो नागरिकांचे स्वच्छतेसाठी श्रमदान

▸▸ शहरात ७३ ठिकाणी 'स्वच्छता ही सेवा'

देशोन्नती वृत्तसंकलन...



देशोन्नती



# हजारों नागरिकों ने किया श्रमदान

शहर में 73 स्थानों पर 'स्वच्छता ही सेवा' अभियान आयोजित, एक तारीख एक घंटा सफाई

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जनजागृतीचे आता विद्यार्थी 'सारथी'

**TheHitavada**

Nagpur City Line | 2023-10-02 | Page- 8
ehitavada.com

# LITU organises programme to mark death anniversary of Raobahadur D Laxminarayan

■ Staff Reporter

THE Laxminarayan Institute of Technological University (LITU) had observed death anniversary of Raobahadur D Laxminarayan. The event took place at the LIT University Auditorium.

Former Vice Chancellor of Institute of Chemical Technology University, Mumbai, *Padma Shri* Prof DR G D Yadav was the chief guest on this occasion. Former Mayor Dayashankar Tiwari was the guest of honour.

Professor GD Yadav shared insights into the life and contributions of Raobahadur D Laxminarayan.

One of the highlights of the event was the formal unveiling of the logo of newly formed LIT University which is now an independent university separated from Nagpur University. This milestone marks the institution's continued commitment to excellence in education and innovation.

The announcement of unveiling of the logo was done through a video shared by a renowned Voice-over artist and proud LIT alumnus of Batch 1970



*Padma Shri* Dr G D Yadav addressing the gathering at the programme.

Harish Bhimani. On this occasio[n] Designer of the Logo Harish Walke, wa[s] also felicitated at the hands of Dr G I[D] Yadav.

LITU Director Dr Raju Mankar presented a captivating journey of LIT t[o] LIT University.

Chairman of LITAA Madhav Labhe, Advisor LITAA Mohan Pande, were also the special guests for the function. Professor of LITU Dr Neeraj Khaty proposed a vote of thanks.

Present on the occasion were LITAA past president Ajay Deshpande alongwith K N Seetha, Prasanna Sohle, office bearers of LITAA Sachin Palsokar, Dr Sugandha Garwey, Shrikant Gudadhe, Sunil Mundhada, Rakesh Gupta, Abhay Nafde, Milli Juneja, Jagdish Thakral, Deepak, Mukesh Vyas, Rajendra Meshram, Rahul Wankhede, Rahul Kulsheshtra, Atul Jain and Haridas Sonarkar.

Director of NEERI Dr Atul Vaidya, ex-Director of NEERI Dr S Sukumar Devotta, ex-Pro Vice Chancellor of RTMNU Dr Gauri Shankar Parasher, Finance

Powered by iDocuments

**देशोन्नती**



# हजारों नागरिकों ने किया श्रमदान

**शहर में 73 स्थानों पर 'स्वच्छता ही सेवा' अभियान आयोजित, एक तारीख एक घंटा सफाई**

महात्मा गांधी की जयंती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारा घोषित 'स्वच्छता ही सेवा' अभियान के तहत रविवार को शहर के हजारों नागरिकों ने स्वच्छता के लिए एक घंटे स्वेच्छा से योगदान दिया. महानगरपालिका द्वारा शहर के विभिन्न स्वयंसेवी संगठनों और नागरिकों के सहयोग से श्रमदान के माध्यम से ऐतिहासिक स्थानों, इमारतों, महत्वपूर्ण स्थानों और आवासीय क्षेत्रों समेत 73 स्थानों पर सफाई की गई.

**लोकसत्ता**

लोकमान्य लोकशक्ती

# रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांचा स्मृतिदिन साजरा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : एलआयटी विद्यापीठात द्रष्टे आणि दानशूर व्यक्तिमत्त्वाचे धनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्मृतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला संशोधक पद्मश्री प्रा. डॉ. जी. डी. यादव, माजी महापौर दयाशंकर तिवारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. यादव यांनी आपल्या उत्साहवर्धक व प्रेरणादायी भाषणातून रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या जीवनकार्य व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल माहिती दिली. विविध उदाहरणे देत त्यांनी शिक्षक, माजी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण वैयक्तिक तसेच, संस्थात्मक विकासासाठी उपयुक्त सूचना केल्या.

02/10/2023 | Nagpur | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

**नवराष्ट्र**

# गांधीसागर परिसराची स्वच्छता

विविध संघटनांकडून श्रमदान



[राष्ट्]रसंत तुकडोजी महाराज नागपूर [विद्याप]ीय सेवा योजना पथक, केंद्रीय [क्ष]ेत्रीय कार्यालय, महापालिका [ला]यन्स क्लब यांच्या संयुक्त [गांधी] सागर परिसरात रविवारी [स्वच्छ]ता मोहीम राबविण्यात आली. [वि]विध घटनांनी या उपक्रमात [सहभा]गी होत श्रमदानातून परिसर [स्वच्छतेच्या सं]कल्पाला हातभार लावला. [...], प्र-कुलगुरु दुधे, कुलसचिव [...] संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालयाचे [फी]ल्ड ऑफिसर सौरभ खेकडे, [...] सहाय्यक आयुक्त धामेच्या, [राष्ट्रीय] सेवा योजना संचालक पिसे, [लायन्स क्लब] नागपूरचे नितीन वर्मा उपस्थित [...] सहभागी रासेयोचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी तलाव परिसर, फूटपाथ, त्याचप्रमाणे गणेश विसर्जन स्थळ परिसरातून कचऱ्याचे निर्मूलन केले. महापालिकेतर्फे हॅन्डग्लब, झाडू व कचरा संकलन साहित्य पुरविण्यात आले होते.

## रासेयोतर्फे विविध ठिकाणी अभियान

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विद्यापीठ परिक्षेत्रात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गांधी सागर परिसर, फ्रीडम पार्क, झिरो माइल मेट्रो स्टेशन, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, मानव विज्ञान विभाग परिसर, महाराज बाग परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, दीक्षाभूमी परिसर, वर्धा येथील सेवाग्राम बापू कुटी, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात जिल्हास्तरावर स्थानिक ऐतिहासिक व महत्त्वाच्या स्थळांवर स्वच्छता अभियान राबविण्यात आल्याची माहिती रासेयो संचालक पिसे यांनी दिली.

# गांधीसागर तलाव परिसर स्वच्छ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर, महापालिका नागपूर व लायन्स क्लब यांच्यावतीने गांधीसागर तलाव परिसरात रविवारी संयुक्तपणे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. श्रमदान कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर येथील पब्लिसिटी फिल्ड ऑफिसर सौरभ खेकडे, महापालिकेचे साहाय्यक आयुक्त महेश धामेचा, विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, लायन्स क्लब नागपूरचे नितीन वर्मा यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांनी स्वच्छतेच्या महत्वाबद्दल मार्गदर्शन केले. सर्व मान्यवरांनी यावेळी स्वच्छता केली.



**देशोन्नती**

# हजारो नागरिकांचे स्वच्छतेसाठी श्रमदान

▸▸ शहरात ७३ ठिकाणी 'स्वच्छता ही सेवा'

देशोन्नती वृत्तसंकलन...

नागपूर ■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त आज रविवारी शहरातील हजारो नागरिकांनी 'एक तास स्वच्छतेसाठी' देऊन श्रमदान केले. महानगरपालिकेद्वारे शहरातील विविध स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने ... अधिक नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छता करण्यात आली.

दीक्षाभूमी परिसरामध्ये मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त सुनील लहाने, मुख्य अभियंता राजीव गायकवाड, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांनी स्वच्छता श्रमदान केले. मनपाच्या गांधीबाग झोन कार्यालयाद्वारे काशीबाईसाहेब भोसले राजघाट (काशीबाईचे देऊळ) ...



विद्यार्थ्यांचे वेशभूषेसह श्रमदान

शहरातील विविध श्रमदान ठिकाणी नागपूर महानगरपालिकेच्या शाळांसह इतर शाळांच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व अन्य थोर राष्ट्रपुरुषांची वेशभूषा करून श्रमदान केले. मनपाच्या विविध शाळांच्या विद्यार्थ्यांसह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे ३५० विद्यार्थी, एनसीसीचे विद्यार्थी आदींनी उत्स्फूर्तपणे स्वच्छता श्रमदानात सहभाग नोंदविला.

# प्रवास व पर्यटन विभागात जागतिक पर्यटन दिन साजरा




नागपूर : पर्यटन क्षेत्र देशाचा विकास करू शकते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागातर्फे आयोजित जागतिक पर्यटन दिवस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी विभागप्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे उपस्थित होते. डॉ. दुधे पुढे म्हणाले, भारत हा विपुल प्रमाणात तसेच वैविध्यपूर्ण नैसर्गिक संसाधनांनी नटलेला देश आहे. देशाला तिन्ही ऋतू भरभरून मिळाले आहेत. प्रत्येक राज्यामध्ये नैसर्गिक विविधता आहे. कुठे डोंगर, कोठे समुद्र तर कोठे वाळवंट असे सर्वच आपणाकडे आहे. सोबतच प्राचीन तसेच प्रगत भारतीय वास्तुशास्त्राची जगाला ओळख आहे. परंपरेने मिळालेल्या गोष्टींकडे आपण संधी म्हणून बघण्याची गरज आहे. तसे झाल्यास येत्या काळात पर्यटन पहिल्या क्रमांकाचा व्यापार बनेल'. प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी, नवीन शैक्षणिक धोरणानुसार विभागातील अभ्यासक्रमांमध्ये पर्यटन विषयाचा समावेश करण्यात आल्याची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय अमन गुंजेवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन खुशी कांबळे हिने केले, तर नरेश मेश्राम यांनी आभार मानले. कार्यक्रमात जयंत साठे लिखित पुस्तक प्र-कुलगुरुंना भेट देण्यात आले. यशस्वीतेसाठी डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. मंजषा डोंगरे, प्रा. परिमल सरडकर, प्रा. भाग्यश्री हिरादेवे, प्रा. नेहा दुबे यांनी

**TheHitavada**

Nagpur City Line | 2023-10-02 | Page- 3
ehitavada.com

# 'NSS plays pivotal role in nation building'

Staff Reporter

[N]ATIONAL Service Scheme [(]NSS) plays a pivotal role in the [p]rogress of the nation, said Dr [S]ubhash Chaudhari, Vice-[C]hancellor, Rashtrasant [T]ukadoji Maharaj Nagpur [U]niversity (RTMNU). He was [s]peaking at the award distri[b]ution ceremony of NSS held [a]t Chhatrapati Shivaji Maharaj [A]uditorium at RTNMU.

Dr Chaudhari presided over [t]he function while Dr Sanjay [D]udhe, Pro V-C, Dinesh [S]heram, NSS Director Dr [S]opandeo Pise were present [i]n the dias.

Dr Chaudhari further said [t]hat NSS' format should be [c]hanged as per the need and [o]ccasion. The NSS should work [i]n a way that the government scheme should reach the last man of the society, he added.




NSS volunteers, who were felicitated, pose for a photo with the dignitaries.

NSS volunteers Manish Kadukar from Institute of Science, Komal Nagrukar from LAD College, Chandrahas Khandare from Samarth College, Lakhni; Nikhil Bansod from NMD College, Gondia were felicitated by the V-C.

NSS officials Dr Vinod Khedkar from Dr N K Umathe College; Dr Chandramohan Singh, Taigolwalkar College; Dr Bhojraj Shrirame, J M Patel College, Bhandara; Dr Gunwant Gadekar D B Science College; Dr Hemant Misal from New Arts Commerce and Science College were also felicitated by V-C Dr Chaudhari.

Powered by iDocuments

# प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुदतवाढ

**विद्यार्थ्यांना १० ऑक्टोबरपर्यंत घेता येणार प्रवेश**

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने अखेर २०२३-२४ वर्षातील प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठाने महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थी आणि इच्छुक दोन्ही विद्यार्थ्यांनी आपली माहिती अपलोड करण्यासाठी अधिसूचना काढली आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना १० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत.

विद्यापीठातर्फे शैक्षणिक सत्र २०२३-२४ करिता सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ८ सप्टेंबरपर्यंत शेवटची तारीख होती. मात्र अनेक परीक्षांचे निकाल उशिरा लागल्याने विद्यार्थ्यांना वेळेत प्रवेश घेता आला नाही. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यामुळे या विद्यार्थ्यांना पदवी प्रथम वर्षाला प्रवेश हवा होता. मात्र विद्यापीठाने ८ सप्टेंबरलाच प्रवेशाची लिंक बंद केली. त्यामुळे हे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. तसेच बी. एड., एल. एल. बी. व इतर व्यावसायिक प्रवेश परीक्षेत अभ्यासक्रमात प्रवेश मिळावे, यासाठी अनेक विद्यार्थी शर्यतीत होते. मात्र अशा अनेक विद्यार्थ्यांना कमी गुणांमुळे प्रवेश मिळाला नाही. हे विद्यार्थी विद्यापीठामध्ये प्रवेश मिळावा, या अपेक्षेत होते. अनेक महाविद्यालयांमध्ये सध्या अनेक जागा रिक्त आहे. त्यामुळे विद्यापीठाने प्रवेशासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली जात होती. शेवटी विद्यापीठाने प्रवेशासाठी मुदतवाढ दिल्याने अनेकांना दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाने काढलेल्या अधिसूचनेनुसार आता १० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

# प्रथम वर्ष में प्रवेश के लिए अंतिम तिथि

▪ अब 10 अक्टूबर तक प्रवेश

